महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

मार्च १९५१

या अंकांत —

सुरेश म. डोळके	८५
लीला वाचासुंदर	१०७
उ. रा. गिरी	१०८
उषा सदाफळ	१०८
के. ल. दप्तरी	१०९
मा. आ. पांढरीपांडे	११०
ना. रा. शेंडे	१११
ना. ल. पोतदार	११३
सुरेश भट	११४
वसंत वऱ्हाडपांडे	११४
ल. ज. खरे	११५
यशवंत धर्माधिकारी	११७
संघ वार्ता	
इत्यादि इत्यादि	

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

वर्ष ६ वें किंमत आठ आणे अंक ३ रा

युगवाणी

संपादक :
वामन चोरघडे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

विद्वद्रत्न डॉ. के. ल. दप्तरी

व्यक्ति व वाङ्मय परिचय

★

सु रे श म. डो ळ के

★

[विद्वद्रत्न डॉ. केशव लक्ष्मण ऊर्फ भाऊजी दप्तरी यांनी गेल्या २२ नोव्हेंबर रोजीं ७१ वें वर्ष लागलें. भारताचा हा आधुनिक महर्षि स्वतंत्र भारताच्या सर्वांगीण पुनरुत्थानाचें आपलें स्वप्न सफल झालेलें पाहण्यासाठी शतायुषी होवो ! —संपादक.]

आपल्या पंचानें भारताच्या पार्थिव दारिद्र्याचा साक्षात्कार घडविणारे व आपल्या विश्वकीर्तीला भारताच्या राजकीय दैन्याची उद्घोषिका बनविणारे गांधीजी, हिमालयाच्या व गंगामाईच्या पवित्र संस्कारांनी परिपुष्ट झालेल्या प्रतिभेने साऱ्या मानवजातीच्या हृत्तारा कंपित करणारे विश्वकवि रवींद्रनाथ व आपल्या आयुष्याची चार तपें 'ज्ञानान्मोक्षा'च्या साधनेंत घालवून, कृतयुगांतल्या क्रांतदर्शी महर्षींच्या दिव्य प्रज्ञाचक्षूंप्रमाणे, आपल्या विशाल, अंतर्भेदी व ज्ञानमय दृष्टीने स्वतंत्र भारताच्या पुनरुत्थानाकरिता उपाययोजना सुचविणारे विद्वद्रत्न भाऊजी दप्तरी !- परमेश्वर तीन रूपांनी भूतलावर अवतीर्ण होत असतो, म्हणतात भिकारी, कवि आणि ऋषी ! गांधीजी, रवींद्रनाथ व भाऊजी हीं एकाच परमेश्वराचीं, भारतात अवतीर्ण झालेली, सत् चित् व आनंदमय अशीं तीन सगुण रूपें होत असें म्हटल्यास ती अतिशयोक्ति होईल काय ?—

शौनकाच्या 'बृहद्देवता' या ग्रंथांतील 'ऋग्वेदमखिलं येही द्रष्टारो मुनिपुंगवः' या वचनांत ऋषींना 'मंत्रद्रष्टे' हें विशेषण लावलें आहे. 'तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व' या तैत्तिरीयोपनिषदांतील वचनांत तप हें ज्ञानाचें साधन म्हणून सांगितलें आहे. ज्योतिर्गणित, वेदविद्या, धर्मशास्त्र, वैद्यक वगैरे शास्त्रांच्या 'स्वतंत्र व मूलगामी' अध्ययनाच्या तपश्चर्येंत भाऊजींनी तपांच्या तपें घालविलीं आहेत. कै. तात्यासाहेब कोल्हटकरांनी 'एक तपस्वी ज्ञानी पुरुष' या गौरवपूर्ण अभिधेने भाऊजींचा जो उल्लेख केला होता, तोहि खरोखरी याच भावनेनें !—

पण; बुद्धीच्या पल्लेदार दुर्बिणीने सत्याच्या ध्रुवताऱ्याचें दर्शन घेणारा मंत्रद्रष्टा किंवा तपश्चर्येच्या खडकाळ पाऊलवाटेने ज्ञानान्मोक्षाचा स्वर्ग गांठणारा तपस्वी, एवढ्या एकाच दृष्टीने भाऊजी महर्षि नाहीत, तर तपःप्रभावाने प्रति सृष्टि

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निर्माण करणाऱ्या विश्वामित्राप्रमाणे, विविध विषयांच्या दीर्घकालीन चिंतनांतून आपल्या शोधनशील प्रतिभाकिरणांनी सिद्धांतांचें म्हणा किंवा प्रमेयांचें म्हणा जें दिव्य तेजोविश्व त्यांनी निर्माण केलें आहे त्यांतच, इंद्रप्रस्थाची स्थापना करणाऱ्या धर्मराजाप्रमाणे, भाऊजींच्या द्रष्टेपित्वाचें सारें मर्म साठविलें आहे. सागराची थोरवी त्याच्या जगड्व्याळ विस्तारापेक्षा त्यांतून उत्पन्न होणाऱ्या अजस्र मेघमालेतच नसते का ? सृष्टींत इतर वृक्ष कितीहि असले तरी भगवंताची विभूति ज्याप्रमाणे अश्वत्थ वृक्षांतच वास करते, स्वर्गाच्या प्रांगणांत तारकांची कितीहि नीरांजनें असलीं तरी अग्रपूजेचा मान ज्याप्रमाणे चंद्रालाच मिळतो, त्याप्रमाणे भाऊजींच्या कर्तृत्वाचें मर्म त्यांनी केलेल्या संकलनात्मक संशोधनांत नसून, त्या संशोधनांतून आविर्भूत झालेल्या विविध सिद्धांतांच्या प्रतिसृष्टींत आहे. ज्योतिर्गणित, धर्मशास्त्र, प्राच्यविद्या, वैद्यक वगैरे शास्त्रांचें केवळ संशोधन व संकलन करूनच ते थांबले असते तरी संशोधकाचें शेलापागोटे त्यांना मिळून शिवाय इतर संशोधकांच्या पदरांत पडणारा कष्टाळुपणाचा कौतुकगर्भ लौकिकहि त्यांना लाभला असता. पण, आपल्या सत्यनिष्ठ बुद्धीचा प्रखर प्रकाशकिरण विविध शास्त्रांवर पाडूनच ते थांबले नाहीत, तर त्या किरणांच्या प्रकाशांत त्या त्या शास्त्रांतील अभिनव रत्नें हस्तगत करून स्वतःच्या प्रतिभेने त्यांचें तेजस्वी पुनर्दर्शन घडविल्यामुळेच त्यांना द्रष्टेपित्वाचें अलौकिक यश लाभलें.

या प्रतिसृष्टींत चंद्राची सुषमा नसेल, पण ग्रहगोलांची द्युति आहे; सरितेची विलोलता नसेल; पण सागराची विशालता आहे व रमणीयतेचें सौष्ठव नसेल, पण भूलोकीं वैकुंठ निर्माण करणाऱ्या क्रांतदर्शी महर्षींच्या प्रतिभेची दिव्यता व प्रत्यक्ष परशुरामाशी युद्ध करून त्याला हरविणाऱ्या भीष्माचार्यांच्या सत्यनिष्ठेची शुचिता आहे.

पण, ऋषींतहि विश्वामित्रासारखे कामी, जमदग्नीसारखे क्रोधी, याज्ञवल्क्या-सारखे लोभी, परशुरामासारखे गर्वोद्धत किंवा दुर्वासासारखे तामसी ऋषी असू शकतात. विद्वद्रत्न भाऊजी हे आपल्या आश्रमांतल्या कामधेनूचें अपहरण किंवा आपल्या शतपुत्रांची हत्या शांत चित्ताने पाहणाऱ्या वसिष्ठ महर्षींसारखे आहेत. १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळींत भाऊजींच्या एका मुलाला किरकोळ दंडाची शिक्षा झाली असतांना, पडत्या फळाची आज्ञा घेऊन पोषणक्षेत्राचा विध्वंस करणाऱ्या वानरांप्रमाणे, पोलीसांनी भाऊजींच्या घरांतील सारें सामान जप्त करून नेलें. कामधेनूचें अपहरण होत असतां जीवन्मुक्त वसिष्ठाच्या चेहऱ्यावर विषादाची यत्किंचितहि छाया तरळली नाही. पोलीसांनी सारें घर धुवून नेलें असतांनाहि, तो जप्तीचा प्रकार पाहून हळहळणाऱ्या आप्तेष्टांना उद्देशून भाऊजींनी 'एका दिवसापुरतें धान्य, वापरायला मातीचीं भांडी व जेवायला केळीचें पान असलें म्हणजे झालें !' हा जो सांत्वनाचा उद्गार काढला, त्याच्या मुळाशी असलेली तितिक्षा, महामृत्युंजय मंत्राच्या उद्गात्याप्रमाणेच, भाऊजींच्याहि ज्ञानयोगाची परिपूर्णता करीत नाही काय !——

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कारंजांतून उसळणाऱ्या जलधारांच्या नृत्याला सभोंवतालच्या फुलझाडांनी शोभा येते ना ! भाऊजींच्या तितिक्षेच्या वनराजीने त्यांच्या त्यागाच्या शैलशिखरालाहि तशीच अनिर्वचनीय शोभा आली आहे. दुर्गम गिरिगव्हरांतून खळाळत बाहेर पडणाऱ्या संजीवनीच्या प्रचंड ओघाप्रमाणे भाऊजींच्या तितिक्षागंगेचा उगमहि त्यांच्या त्यागाच्या मेरुपर्वतांत आहे. १९०६ साली मुंजे-अभ्यंकरांच्या नेतृत्वाखाली '१६ सर्कलची' स्थापना करून राष्ट्रीय कार्याच्या ज्या त्यागमय जीवनांत भाऊजींनी पदार्पण केलें, त्याच्या तीव्रतेने संसाराचा उन्हाळा झाला असतांहि भाऊजींच्या तोंडून कधी असमाधानाचा उद्गार बाहेर पडला नाही उलट, त्यामुळे त्यांच्या तपःपुनीत जीवनाला तप्त सुवर्णाप्रमाणे अलौकिक तेजस्वीताच प्राप्त झाली आहे.

१९३० च्या स्वातंत्र्ययुद्धांत वऱ्हाडांतील एका इस्टेटीच्या निर्णयांत कोर्टाने भाऊजींना पंच होण्याची विनंती केली व त्याकरिता १०० रु. रोज व प्रवासखर्च देऊ केला असतांहि भाऊजींनी त्या विनंतीचा स्वीकार केला नाही. दारिद्र्याच्या वेलीला संपत्तीचीं फुलें लागत नसलीं तरी ऐश्वर्याच्या मृगजलाच्या नादाने कितीतरी हरिणें आपल्या जीवाचें रान करून घेत असतात. भाऊजींसमोर इथे संपत्तीचें मृगजळच काय, पण प्रत्यक्ष पाणथळ हात जोडून उभें होतें. पण भाऊजींनी तिकडे ताठ मानेने पाठ फिरविली. दारिद्र्याच्या आंचेने होरपळून विश्वामित्राने चांभाराच्या झोपडीतील कुत्र्याचें मांस चोरून खाल्याची कथा पुराणांत आहे. भाऊजी जर त्यावेळी तिथे असते व चांभाराने त्यांना जेवण्याचा आग्रह केला असता तर त्यांनी त्याच्या विनंतीचा अव्हेर करून, त्याला आशीर्वाद देऊन उलट त्याच्याच सुखसमृद्धीची ईश्वराजवळ प्रार्थना केली असती. त्यागमय जीवन झालें तरी त्याचा आविष्कार यापेक्षा सुंदर तो काय असणार ! कुबेराच्या भक्तिभावावर भुलून त्याच्या चैत्ररथ वनांत येऊन राहिल्यावर अलका नगरीवर चंद्र जसा कधीच मावळला नाही, त्याप्रमाणे भाऊजींच्या त्यागभावनेवर भुलून त्यांच्या आत्मसंतुष्ट, आत्मक्रीड वृत्तीनेहि त्यांचा कधी त्याग केला नाही.

दुसऱ्या एका प्रसंगी भाऊजींचे परमस्नेही श्री. हरिभाऊ मोहनी यांनी भाऊजींना स्वास्थ्यदायक व ज्ञानपोषक अशी विद्यापीठाच्या ग्रंथपालाची जागा स्वीकारण्याचा आग्रह केला. तेव्हां भाऊजींनीच त्यांना उलट विचारलें, "हजारो लोक तुरुंगांत जात असतांना तुम्ही मला पैसे मिळविण्याचा—व तेंही परकी सरकारने स्थापन केलेल्या विद्यापीठाकडून—सल्ला देतां याला काय म्हणावें ?" १९४१ सालीं नागपूर विद्यापीठाकडून डी. लिट्. चा स्वीकार करतांना भाऊजींनी इंग्रज गव्हर्नराचा स्पर्श, हस्तांदोलनाच्या निमित्ताने कां होईना, पण आपल्या शरीरालाहि होऊं दिला नाही, इतकेंच नव्हे, तर इंग्रज सरकारकडून वर्षासन घ्यावें लागेल या एकाच जाणिवेने, जिवलग स्नेह्यांच्या सतत आग्रहालाहि न जुमानतां, भाऊजींनी 'महामहोपाध्याय' या बहुमानाचाहि स्वीकार केला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाही. विश्वामित्राच्या आदेशानुसार राक्षसांकडून आपल्या शतपुत्रांची हत्या होत असतांहि ती शांतचित्ताने पाहणारा वसिष्ठ, राघोबादादा सारख्या प्रबळ राज्यकर्त्याला भर दरबारांत देहान्त प्रायश्चित्ताची शिक्षा सुनावणारा रामशास्त्री, प्रबळ साम्राज्य-सत्तेला 'पृथ्वीवरल्या न्यायदेवतेपेक्षा अधिक उच्च न्याय देणारी शक्ति जगांत आहे, असें रोखठोक उत्तर देणारे लोकमान्य टिळक किंवा वर्षी अठरा विश्वें दारिद्र्य असतांहि लक्ष्मीला निर्भयतेने पाठ दाखविणारे विद्वद्रत्न भाऊजी!—"नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः" हें आत्म्याच्या अमरत्वाचें वर्णन वाचतांना तें Ivory Tower च्या स्वरूपाचें असावें असें मला नेहमी वाटे. पण वरील उदाहरणांवरून—ती केवळ कवीची कल्पनाच नाही— लोकोत्तर पुरुषांच्या अद्वितीय चारित्र्याचा आविष्कार आहे तो!

ग्रे कवीने दारिद्र्याचें ज्ञानमार्गातील एक धोंड म्हणून वर्णन केलें आहे. तो म्हणतो—

> " But knowledge to their eyes her ample page
> Rich with the spoils of time, did ne'er unroll;
> Chill penury repress'd their noble rage,
> And froze the genial current of the soul."

भर्तृहरीनेहि विद्वानांचें दारिद्र्य हें आपल्या हृदयांतील एक शल्य म्हणून वर्णन केलें आहे. पण, भाऊजींचा क्रांतिकारक शोधांनी परिपूर्ण असलेला प्रकाशित व अप्रकाशित ग्रंथसंभार पाहिला म्हणजे किंवा त्यांच्या ज्ञानगंभीर मुखावरलें प्रसन्न हास्य पाहिल्यावर ग्रेच किंवा भर्तृहरीचे उद्गार कुणाला खरे वाटतील!—

भाऊजींच्या मार्गांत दारिद्र्य आणून आणून किती अडथळे आणील? किंबहुना, भाऊजींसारख्या विरागी ज्ञानोपासकाला दारिद्र्य हें भर्तृहरीप्रमाणे शल्य न वाटतां निःस्पृह आणि निर्भय ज्ञानोपासनेचें स्वाभाविक भूषण वाटतें. आणि तें तसें वाटावें अशीच खरोखरी भारतांतल्या ज्ञानवीरांची परंपरा आहे. ज्ञानोपासना म्हणजे एक प्रकारची तपश्चर्याच!—तपश्चर्या करतांना ऐहिक ऐश्वर्याचे सारे संस्कार बाजूला सारून भणंग भिकाऱ्याच्या वेशाने अरण्यांत जाऊन परमेश्वराची साधना करावी लागते ना! दारिद्र्याच्या अग्निदिव्यांतून बाहेर पडल्यावरच ज्ञानांच्या मंदिरांत पाऊल टाकतां येतें. इन्द्राच्या अमरावतीची किंवा विष्णूच्या क्षीरसमुद्राची इच्छा न करतां केवळ एक लंगोटी लावून उग्र ज्ञानोपासना करण्याच्या व्यासंगानेच बहुधा, शंकराला 'देवाधिदेव' किंवा 'मृत्युंजय' होतां आलें असावें. विद्या ही मोठी विचित्र देवता आहे.

शिवाय, भाऊजींचें दारिद्र्य हें क्रमप्राप्त नसून सॉक्रेटिसाप्रमाणे स्वेच्छार्जित आहे. रोज शंभर रुपयांची प्राप्ति होत असतां, विद्यापिठाच्या ग्रंथपालाची स्वास्थ्यदायक व ज्ञानपोषक नोकरी आयती चालून आली असता, किंबहुना, पोलिसांनी घरांतलें सारें सामान जप्त करून नेल्यावर त्या आणीबाणीच्या प्रसंगीं मित्रांनी मदतीची तयारी दर्शविली असतांहि ज्यांनी त्यांना विनयपूर्वक नकार दिला, त्या भाऊजींचें दारिद्र्य हें स्वेच्छार्जित नाही तर काय म्हणावें! या स्वेच्छार्जित

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दारिद्र्यामुळे भाऊजींच्या व्यक्तित्वाला काय किंवा वाङ्मयाला काय, रामशास्त्री प्रभुण्यांप्रमाणे, निःस्पृहतेची व निर्भयतेची प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. 'करणग्रंथ' लिहवून घेणारे लो. टिळक असोत, अखिल भारतीय ज्योतिष परिषदेचे अध्यक्ष पं. मदनमोहन मालवीय असोत, किंवा येरवड्याला अस्पृश्यतानिवारणाची चर्चा करणारे म. गांधी असोत, आपल्याला जें मत प्रामाणिकपणे पटतील त्यांचें निर्भयतेने प्रतिपादन करण्यांत भाऊजींनी कुणाचीहि भीडमुर्वत ठेवली नाही. इंदूरच्या ज्योतिषसंमेलनांत पंचांगशुद्धतेसारख्या केवळ शास्त्रीय प्रश्नाचा निर्णय बहुमताने लावूं पाहणाऱ्या पं. मालवीयजींसारख्या सभाध्यक्षालाहि "शास्त्रीय ज्ञानाची व सत्याची चाड आपणांस मुळींच नसल्यामुळे मी येथे राहूं शकत नाही' असें खणखणीत उत्तर अंगावरलें कांबळें सांवरीत देणारी भाऊजींची ती लोकोत्तर निर्भयता!— भाऊजींना पाहतांच, गारद्यांच्या नंग्या समशेरी प्रहार करण्यास उपासल्या असतांहि भर दरबारांत राघोबादादाला देहान्त प्रायश्चित्ताची शिक्षा सुनावणारा तेजस्वी रामशास्त्री डोळ्यांपुढे उभा रहावा यांत नवल तें कसलें?

कायदेभंगाच्या काळांत ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीकडून मध्यप्रांत कॉंग्रेस कमिटीला हिशेबाच्या चोखपणाबद्दल जें पहिल्यानंबरचें प्रशस्तिपत्र मिळालें, त्याचें सव श्रेय भाऊजींच्या कोषाध्यक्षत्वालाच द्यावें लागेल. इतकेंच नव्हे, तर गांधी–इर्विन तहानंतर बॅ. अभ्यंकर जेव्हां तुरुंगांतून सुटून आले तेव्हां त्यांच्या सन्मानार्थ चिटणीस पार्कांत भरलेल्या जाहीर सभेंत युद्धमंडळाच्या कोषाध्यक्षाचें अभिनंदन करतांना त्यांच्या तोंडून आनंदाच्या भरांत 'दप्तरींनी दप्तर चांगलें सांभाळलें' असे अभिमानाचे उद्गारहि बाहेर पडले. पाटलीपुत्राच्या राज्यसिंहासनावर चंद्रगुप्ताची प्रस्थापना करून स्वतः साऱ्या मगध साम्राज्याचा मंत्रि झाल्यानंतरहि स्वतःच्या विनियोगाकरिता राज्याचा एक पैसाहि खर्च न करणाऱ्या आर्य विष्णुगुप्ताच्या निर्मम वृत्तीप्रमाणेच, भाऊजींची ही निःस्पृह वृत्ति त्यांच्या विशुद्ध चारित्र्याला व उग्र ज्ञानोपासनेला शोभादायकच नाही काय? आपल्या देशभक्तीच्या प्रखरतेने प्रांतिक राजकारणाचे मानदंड झालेले देशभक्त या प्रांतात अनेक असतील, पण आपल्या निर्मल आणि निःस्पृह चारित्र्याने भाऊजींनी जी वादातीत आणि पक्षातीत मान्यता संपादन केली आहे तिला, या प्रांतात तरी तोड नाही.

वैशाखांत आटणाऱ्या सरितेच्या पोटांतहि तृषार्ताला संजीवनीचा साक्षात्कार होतो ना? स्वतःच्या आश्रयाला येणाऱ्या कपोताच्या रक्षणाकरिता आपल्या शरीराचें मांस कापून देणाऱ्या शिबिराजाप्रमाणे, भाऊजीहि, वेळ प्रसंगी कर्ज काढूनहि, आपल्या आश्रयार्थीला मदत करण्यास कमी करीत नाहीत. १९२१ सालीं नागपुरास स्थापन झालेल्या नॅशनल कॉलेजचें व त्यानंतर जगद्गुरु श्री. शंकराचार्य यांच्या नाशिक येथील धर्म महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून भाऊजींनी निर्वेतन केलेलें काम पुष्कळांच्या स्मरणांत असेल; पण येथील Independent साप्ताहिकावर ब्रिटिश सरकारचा प्रकोप होताच त्याला आर्थिक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सहाय्य करणारे भाऊजी हे पहिलेच सद्गृहस्थ होत हें सांगितलें म्हणजे त्यांच्या साहाय्यशीलतेची तेव्हांच कल्पना येईल. संपादकांनी भाऊजींचे तें आर्थिक साहाय्य स्वीकारलें नाहीं, हा भाग वेगळा !

'सत्य-ज्ञान' हाच भाऊजींचा मोक्ष आहे. या सत्यज्ञानाच्या इव्यासानेच भाऊजींना तत्वनिष्ठुर बनविलें आहे. त्यांची तत्वनिष्ठुरता इतकी जाज्वल्य आहे की, ती, पर्वतांचेंहि पक्षच्छेदन करणाऱ्या देवेन्द्राच्या अमोघ वज्रप्रहाराप्रमाणे, प्रत्यक्ष पुत्रप्रेमाचेंहि पक्षच्छेदन करावयास मागेपुढे पाहत नाही. भाऊजींचा मुलगा एल्. एम्. पी. ची परीक्षा पास झाल्यावर त्याने घरींच दवाखाना थाटण्याचा विचार केला. पण भाऊजी पडले होमिओपॅथीचे कट्टे अभिमानी. ते आपल्या घरांत ॲलोपॅथीचा संसार कसा चालूं देतील ? त्यांनी मुलाला चक्क बजाविलें कीं, 'या घरांत होमिओपॅथीचीच प्रॅक्टीस करतां येईल व तूं ॲलोपॅथीचा दवाखाना कुठेहि थाटलास तरी त्या औषधाकरिता तुला घरांतून एकहि पैसा मिळणार नाही.'' मुलगा बिचारा कांय करणार ? त्याला मुकाट्याने आपलें ॲलोपॅथीचें ज्ञान गुंडाळून ठेवून भाऊजींच्या होमिओपथीचाच स्वीकार करणें भाग पडलें ! या सत्यज्ञानाच्या साधनेकरिता आजहि, सत्तरी ओलांडल्यावर, डोळे अधू व शरीर गलितगात्र झाल्यावरहि, उतारवयांत विषाचा पेला तोंडाला लावणाऱ्या हंसतमुख सॉक्रेटिसाप्रमाणे किंवा सत्यपालनाकरिता परशुरामासारख्या प्रत्यक्ष गुरुशीही युद्ध करणाऱ्या भीष्माचार्याप्रमाणे, कुणाचीहि अवकृपा ओढवून घेण्यांत ते कर्तव्य मानतात.

या तत्वनिष्ठुरतेने भाऊजींचा संसार अधिकच कष्टमय केला आहे. या बद्दल त्यांच्या मित्रांना हळहळ वाटल्याशिवाय कशी राहील ? पण भाऊजींनी जाणूनबुजून अंगिकारलेलें हें सतीचें वाण !- मातेला दास्यमुक्त करण्याच्या ईर्ष्येनें गरुडाने जेव्हा देवलोकी जावयाला भरारी मारली तेव्हा त्याच्या मित्रांना त्याचें तें साहस अनुचित वाटून त्याबद्दल हळहळ वाटली, तरी आकाशात मंडळावर मंडलें घेत संथपणाने तरंगणाऱ्या किंवा विमानाप्रमाणे मैलोंगणति अविश्रांत उड्डाण करणाऱ्या गरुडाला त्याची काय पर्वा ? भाऊजींसारख्या अलौकिक व्यक्तीकडे पाहूनच कवीला

उदयति यदि भानु: पश्चिमे दिग्विभागे
विकसति यदि पद्मं पर्वतानां शिखाग्रे ।
प्रचलति यदि मेरुः शीततां याति वह्नि:
न चलति खलु वाक्यं सज्जनानां कदाचित् ।।

हा श्लोक रचण्याची स्फूर्ति झाली असावी !-

भाऊजींच्या खड्गासारख्या लखलखीत तत्वनिष्ठुरतेला मानवतेची जी असामान्य जोड मिळालेली आहे, त्यामुळे तर ते अधिकच वंदनीय वाटतात. वरून रुक्ष दिसणाऱ्या खडकाच्या अंतरंगांतच अमृतालाहि लाजविणारे जलस्रोत पाझरत असतात ना ! भाऊजींची तत्वनिष्ठुरताहि तशीच— !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भाऊजींच्या घरीं कसलेंसें मंगलकार्य होतें. मुख्य पंक्तीची तयारी सुरू होती. इतक्यांत एक भिकारीण कळवळून भाऊजींच्या दाराशी आली. भाऊजींनी तिला सर्वांच्या आधी भर पंक्तींत जेवावयाला बसविलें. थोड्या वेळाने सर्व पानें भरलीं. सर्वांचें जेवणहि झालें, तरी ती भिकारीण जेवीतच होती. तिचें 'यथास्थित' होई-पर्यंत तिला कुणीहि पानावरून उठविलें नाही.

ब्राह्मणाकरिता तयार केलेलें श्राद्धान्न महारांची इच्छा तृप्त करण्यासाठी त्यांना वाढून दिल्याचा एक प्रसंग एकनाथांच्या चरित्रांत आहे. महिपतीने आपल्या 'भक्तविजयांत' त्याचें—

'जनी जनार्दन आहे निश्चित । हा भाव जाणोनि चित्तांत
संकल्प सोडी एकनाथ । भोक्ता कृष्णनाथ म्हणवूनी'

—अ० ४६, ६२.

असें वर्णनहि केलें आहे. वेदांना पौरुषेय मानणाऱ्या, धर्मपरिवर्तनाच्या बाबतींत हटातटाने झगडणाऱ्या, वेदप्रामाण्यापेक्षा बुद्धिप्रामाण्याला अधिक महत्त्व देणाऱ्या व "भक्ताहून भिन्न व भक्ताची इच्छा पुरविण्याकरिता आपल्याच जगाचें नियमन करणाऱ्या नियमांचा भंग करणारा असा ईश्वर कोणाहि बुद्धिमान मनुष्यास मान्य होऊ शकणार नाही व आम्हासहि मान्य नाही" (ध. वि. स्व. पृ. २५१] अशी खणखणीत घोषणाऱ्या भाऊजींनी—

" सर्वांहि भूतांसि सदा नमावें । कोणा विनाहेतु न दुःख द्यावें
प्रेमा जसा ठेविसि आत्मजीवीं । त्वदन्यजीवीं हि तसाच ठेवी ॥ २

किंवा

सदा स्वयत्नार्जित अन्न खावें । उरेल तें दीन जनास द्यावें
त्यां दुःखितां सोडविण्या झटावें । स्वकीय जीवासहि तें त्यजावें ॥ ३

ध. वि. स्व. (पृ. २५२)

असे उद्गार काढावें हें खरोखरीच केवढें नवल !

—पण त्यांत नवल तरी कसलें ? पहाडालाच पाझर फुटतात. हलाहल प्राशन करणाऱ्या शंकराच्या डोक्यांतूनच सगरपुत्रांना जीवदान देणारी गंगा प्रकट होते. अर्थात तत्त्वनिष्ठ भाऊजी आपल्या अजातशत्रुत्वाने धर्मराजाच्या, बुद्धि-प्रखरतेने चाणक्याच्या, उदारतेने कर्णाच्या, वैराग्याने शुकाचार्यांच्या व सहृदयतेने एकनाथ-तुकारामांच्या मालिकेंत निःसंशय शोभूं शकतात.

विद्वद्रत्नांच्या ग्रंथरत्नांचा थोडक्यांत परामर्श घेऊन आर्य चाणक्याप्रमाणे 'बुद्धिस्तु मागान्मम' अशी घोषणा करणाऱ्या या आधुनिक महर्षींच्या जीवन-ध्येयाचा थोडक्यांत परिचय करून देण्याचा प्रयत्न करतों.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

ग्रहगणित कुतूहल [अप्रकाशित]

(लेखन इ. स. १९१८)

कॉलेजांत शिकत असतांनाच भाऊजींचें लक्ष गणित-ज्योतिष ग्रंथाकडे व विशेषतः ग्रहलाघवाकडे उत्कटतेने वळलें, व त्यांनी भट्टजीशास्त्री घाटे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रहलाघवाचा अभ्यास सुरू केला. घाटेशास्त्र्यांनी भाऊजींना ग्रहलाघवांतील बेरीज वजाबाकी शिकविली; पण गणिताची उपपत्ति शिकविली नाही. त्यामुळे ग्रहलाघवांत सूर्यस्पष्टीकरणाचें जें गणित आहे त्याचा 'ग्रह दीर्घ-वृत्तांत कांही विशिष्ट नियमाने फिरतात' या सिद्धांताशी भाऊजींना मेळ घालतां येईना. याकरिता त्यांनी ग्रहलाघवांतील 'मल्हारी दैवज्ञा'च्या टीकेचा कसून अभ्यास केला. पण तरीहि त्यांची जीज्ञासा पूर्ण न झाल्यामुळे त्यांनी 'लूनर थिअरी'चें एक पुस्तक मुद्दाम कलकत्याहून मागवून त्याचा अभ्यास केला. या सर्वांचा परिपाक म्हणून, ज्यावरून थोडया कोष्टकांनी, त्रिकोणमितिसारख्या उच्च गणिताच्या ज्ञानाशिवाय, आधुनिक ज्योतिःशास्त्रानुसार, ग्रहाचें सूक्ष्म गणित श्रमां-शिवाय करतां येईल असा, 'मेंदूचे तुकडे पडल्यासारखे वाटावें' इतके प्रदीर्घ परिश्रम करून, १९१२ च्या अखेरीस "ग्रहगणितकुतुहल" नांवाचा ग्रंथ लिहून पूर्ण केला. यांत ग्रहगणिताच्या गति कल्पिल्या आहेत. ज्योतिर्गणितांत क्रांतिकारक ठरणारा हा ग्रंथ अजूनहि प्रसिद्ध होऊ नये हा दैवदुर्विलासच नव्हे काय ?

महाभारतीय युद्धकाल निर्णय

(लेखन १९१३; प्रकाशन १९१८)

'ग्रहगणितकुतुहल' लिहीत असतांनाच 'महाभारतीययुद्धकालनिर्णय' हा प्रबंध लिहिण्याकडे भाऊजींचें लक्ष वेधलें. ह्यांत महाभारतांतील ग्रहस्थितीवरून भारतीययुद्धाचा काळ ठरविला आहे; व पुराणांतील वचनांवरूनहि तोच काळ ठरतो असें भाऊजींनी सिद्ध केलें आहे. महाभारताच्या 'प्राप्तं कलियुगं विद्धि' या शल्यपर्वांतील किंवा 'एतत्कलियुगनाम अचिराद् यत्प्रवर्तते' या वनपर्वांतील वचनांवरून भारतीययुद्ध कलियुगारंभीं झालें असें ठरतें. वैदिक कलियुगारंभ शकपूर्व ३१८० असा समजतात. अर्थात, त्यावरून श. पू. ३१८० हाच भारतीययुद्धाचा काल ठरावयास पाहिजे. परंतु, भाऊजींना हें मत मान्य नाही. ज्योतिर्गणिताच्या साह्याने त्यांनी प्रस्तुत काल शकपूर्व १२७५ हा ठरविला आहे. वायुपुराणांतील व ब्राह्मणांतील अनेक वचनांवरून असें दिसतें की, कलियुग १०० वर्षांचें, द्वापर २०० वर्षांचें, त्रेतायुग ३०० वर्षांचें व कृतयुग ४०० वर्षांचें घेत. चार वर्षांचें एक पोटयुग मानीत; प्रत्येक वर्ष ३६० दिवसांचें घेत तरी प्रत्येक चार वर्षांनंतर २१ दिवस जास्त येत असल्यामुळे चवथे वर्ष ३८१ दिवसांचें मानीत. या चार वर्षांच्या कालासच युग असें म्हणत, व प्रत्येक युगाच्या शेवटी 'अश्वमेध' नांवाचा यज्ञ करीत. भारतीययुद्ध कलियुगारंभीं झालें. अर्थात, या कालगणनेवरून कलियुगाचा आरंभ म्हणजेच भारतीययुद्धाचा काल शकपूर्व १२७५ किंवा इ. स. पूर्व ११९७ हाच निश्चित ठरतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रस्तुत प्रबंध भाऊजींनी १९१३ साली लिहिला व तो १९१८ साली ' विविधज्ञानविस्तारांतून प्रसिद्ध झाला. या प्रबंधांत प्रकट झालेली भाऊजींची गाढ विद्वत्ता व ज्योतिर्गणिताचें सूक्ष्म ज्ञान पाहून कै. तात्यासाहेब कोल्हटकर इतके कांही हर्षविस्मित झाले की, त्याच वर्षी मुद्दाम नागपुरास येऊन त्यांनी महाराष्ट्राला अपरिचित असलेल्या या महापंडिताची भेट घेतली, भाऊजींच्या प्रगाढ विद्वत्ते-बद्दल व नाविन्यपूर्ण व प्रत्ययोत्पादक विचारसरणीबद्दल त्यांचें अभिनंदन केलें व ' भारतीय ज्योतिःशास्त्रनिरीक्षण' हा जो दुसरा प्रबंध त्यांच्याजवळ लिहून तयार होता, तो त्यांना वाचावयाला मागितला. त्याच निबंधाला पुढे दहा वर्षांनी, कुठल्याहि ग्रंथाला प्रस्तावना लिहायची नाही असा निश्चय केल्यावर व डोळ्यांस अंधत्व आल्यावरहि, तात्यासाहेब कोल्हटकरांनी अत्यंत विद्वत्तापूर्ण प्रस्तावना लिहिली. त्यांत त्यांनी ' दप्तरींनी प्रस्तुत निबंध इंग्रजींत प्रसिद्ध केला असता तर त्याचें चीज झेंाल असतें ' असा स्पष्ट अभिप्राय व्यक्त केला आहे.

कोल्हटकराप्रमाणेच टिळकांचेंहि लक्ष भाऊजीकडे त्यांच्या प्रस्तुत निबंधानेच वेघल्या गेलें. भाऊजींनी ठरविलेला कालनिर्णय टिळकांना मान्य होऊन शिवाय त्यांतील विवेचनहि त्यांना इतकें नाविण्यपूर्ण वाटलें की; ता. १ सप्टेंबर १९१५ रोजीं डॉ. मुंजे यांना पाठविलेल्या पत्रांत त्यांनी असें स्पष्ट म्हटलें आहे—

> "I have read and re-read Mr.Daftari's M. Essay. The conclusion is in my opinion Sound. He has, no doubt, worked for himself and his essay contains some entirely new suggestions. Will he not, translate it into English ? I should advice him to do so and publish in some oriental " journal "

लोकमान्य टिळक व तात्यासाहेब कोल्हटकर आणखी कांही दिवस जिवंत असते तर भाऊजींचीं सर्व ग्रंथरत्नें प्रकाशांत येऊन त्यांच्या प्रभेनें ज्योतिर्गणित प्राच्यविद्या, वैद्यक वगैरे शास्त्रांच्या दशदिशा उजळून निघाल्या असत्या पण......

वैदिककालगणनापद्धति व श्रीरामचंद्रजन्मकालनिर्णय [प्रकाशनः १९२५]

भाऊजींनी ठरविलेल्या भारतीय युद्धकालनिर्णयाशी [श. पु. १२७५] महाभारतांतील कालनिर्णयाचा [श. पु. ३१८०] विरोध येत असल्यामुळे त्याचा परिहार करण्याकरिता भाऊजींनी 'वायुपुराणाचा' व युगपद्धतीचा फारच सूक्ष्म अभ्यास केला. या प्रदीर्घ अभ्यांतूनच भाऊजींचा प्रस्तुत प्रबंध अविर्भूत झाला आहे.

या प्रबंधांत वायुपुराणादि प्राचीन इतिहासग्रंथावरून (' इमं यो ब्राम्हणो विद्वान् इतिहासं पुरातनं' वा. पु. १०३,४८) व ऋग्वेदादि धर्मग्रंथांवरून भाऊजींनी असा सिद्धांत काढला आहे कीं, वैदिक कालीं दैवी व मानुषी अशा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दोन्ही युगपद्धति अस्तित्वांत होत्या. दैवी युगपद्धतींत ४००० वर्षांचें कृतयुग, ३००० वर्षांचें त्रेतायुग, २००० वर्षांचें द्वापर व १००० वर्षांचें कलियुग मानीत. हें दैवी द्वापरच शकपूर्व ३१८० मध्ये सुरूं झालें. मानुषी युगपद्धतींत ४०० वर्षांचें कृतयुग, ३०० वर्षांचें त्रेता, २०० वर्षांचें द्वापर आणि १०० वर्षांचें कलियुग मानीत. मानुषी युगपद्धतीच्या कृतयुगाचा आरंभ शकपूर्व ३१८० हाच होता. अर्थात्, मानुषी कृतयुगाच्या आरंभीच भारतीय युद्ध झालें.

सनातनी पंडित श. पू. ३१८० या काळीं दैवी कलियुग सुरूं झालें असें मानतात. भाऊजींच्या मतें श. पू. ३१८० मध्ये दैवी द्वापर सुरूं झालें. साऱ्या प्राचीन पुराणग्रंथांत इतिहास सांगतांना मानुषीयुगपद्धतीचाच उपयोग केला आहे. दैवी युगपद्धतीचा उपयोग फक्त तत्वज्ञानादि मोठीं शास्त्रें सांगतांनाच काय तो केलेला दिसतो. ज्योतिषकालिदेखील शकपूर्व ३१८० मध्येच सुरूं झाला.

शकपूर्व ३१८० हा काल फार महत्वाचा आहे. त्या काळीं सर्व ग्रह अश्विनी नक्षत्राच्या आरंभी एकत्र झाले होते. या काळापासून व या आरंभ-स्थानापासूनच भारतीय ज्योतिषी आपली सर्व गणितें करीत.

"चतुर्विंशे त्रेतायां" या वायु पुराणांतील वचनावरून श्रीरामाचा जन्म त्रेतायुगांतील २४ व्या युगांत झाला. म्हणजे मानुषी कृतयुगाचा एक फेरा (४०० +३००+२००+१००=१००० वर्षें) +कृतयुग (४०० वर्षें) + ४ वर्षांचा एकेक अशी २३ युगें (९२ वर्षें) + १ वर्ष =१४९३, म्हणजे श्रीरामाचा जन्म कृतयुग सुरूं झाल्यानंतर १४९३ या वर्षी किंवा (३१८०–१४९३= १६८७) शकपूर्व १६८७ या काळीं झाला हें सिद्ध होतें. या काळाशी रामायणांत सांगितलेली सर्व ग्रहस्थिति उत्तम जुळते.

भाऊजींचा प्रस्तुत प्रबंध बडोद्याच्या 'सद्‌विचार' मासिकांत १९२५ साली प्रसिद्ध झाला. प्रस्तुत प्रबंधांतील विवेचन ऐतिहासिक दृष्ट्याहि इतक क्रांतिकारक आहे की, त्यामुळे आजवर प्रचलित असलेला भारतीय आर्यांचा अत्यंत प्राचीन म्हणजे मौर्यपूर्व इतिहासहि आमूलाग्र बदलून जातो. किंबहुना, राजकारण, धर्म-शास्त्र, समाजशास्त्र, तत्वज्ञान, वाङ्मय, कला वगैरे शास्त्रांच्या इतिहासांत आज जी अंदाधुंदी माजली आहे, ती नाहीशी करण्यास आपण ठरविलेली युगपद्धतीच कारणीभूत होईल अशी भाऊजींची अविचल निष्ठा आहे. 'The Astronomical method and its application to the chronology of ancient India' या ग्रंथाच्या उपसंहारांत भाऊजी म्हणतात:—

"We have thus tried to evolve an order out of what appeared a chaos and what always baffled and disappointed a truth-seeking historian. We hope this will help all historians, namely historians of Politics, Social Affairs, Dharma, Science, Literature, Philosophy or Arts in Aryan India; and our labours will be well rewarded if such historians consider and make proper use of what we have set forth in these lectures." (p. 247)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९५१
मार्च

भारतीय ज्योतिशास्त्रनिरीक्षण [लेखन १९१८ प्रकाशन १९२९]

भारतीय संस्कृतीच्या पवित्र व गंभीर जलाशयांतूनच जगांतल्या ज्योतिःशास्त्राच्या मंदाकिनीचा उगम झाला. वसिष्ठाने शीघ्रफलप्रमेयाचा सिद्धांत सांगून भारतांतीलच काय, पण जगांतल्या ज्योतिःशास्त्राचा पाया घातला. त्यानंतर अग्निपुराणांतदेखील चंद्रसूर्यस्पष्टीकरण सांगणाऱ्या वसिष्ठसिद्धांताचा उल्लेख आढळतो. ग्रीकांच्या ज्योतिःशास्त्राचें प्रवर्तन इजिप्तमध्ये ह्यावेळी नुकतें कुठे सुरू झालें होतें.

असें असूनहि, भारतीयांनी आपलें ज्योतिःशास्त्र इतरांकडून उसनें घेतलें असा अनेक पाश्चात्य ग्रंथकारांनी त्यांच्यावर आरोप केला होता. या आरोपाचें निरसन करण्याकरताच मुख्यतः त्यावेळचे अग्रगण्य ज्योर्तिविद कै. शं. बा. दीक्षित यांनी 'भारतीय ज्योतिःशास्त्र' नांवाचा इतिहासात्मक बृहद्ग्रंथ १८९६ मध्यें प्रसिद्ध केला.

परंतु, ग्रहाच्या वास्तविक गति ठरविण्याकरिता भारतीय ज्योतिःशास्त्राचें दीक्षितांनी केलें त्यापेक्षा अधिक सूक्ष्म निरीक्षण करणें अवश्य होतें. शिवाय, भारतीयांनी ज्योतिःशास्त्र ग्रीकापासून उसनें घेतलें नाही हें ठरविण्याकरताहि जुन्या सिद्धांताचें सूक्ष्म निरीक्षण करणें जरूर होतें.

हें कार्य भाऊजींनी 'भारतीयज्योतिःशास्त्रनिरीक्षण या :प्रबंधांत उत्कृष्ट रीतीने केलें आहे. त्यांत त्यांनी दीक्षितांच्या ग्रंथांतील उणीवांचें व चुकांचें आविष्करण करून भारतीय व पाश्चात्य ज्योतिःशास्त्रांतील सिद्धांताचा उत्कृष्ट समन्वयहि साधला आहे.

लोकमान्य टिळकांनी प्रस्तुत प्रबंध तात्यासाहेब कोल्हटकराकडून मुद्दाम मागवून वाचला होता. या प्रबंधांत प्रकट झालेल्या भाऊजींच्या ज्योतिर्गणिताच्या सूक्ष्म ज्ञानाने व केवळ ज्ञानोपासकाच्या विशुद्ध भूमिकेवरून त्यांनी केलेल्या नाविन्यपूर्ण विवेचनाने लो. टिळक इतके हर्षविस्मित झाले होते की, १९२० साली सांगली येथे तात्यासाहेब कोल्हटकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या ज्योतिषसंमेलनांत ज्यावरून शुद्ध पंचांगाचें गणित थोड्या श्रमांत सूक्ष्मपणाने करता येईल असा करणग्रंथ तयार करण्याचा ठराव झाला, व जेव्हा त्यावेळचे अग्रगण्य ज्योतिर्विद कै. व्यं. बा. केतकर यांनी रैवतपक्षाच्या मतानुसार नवा करणग्रंथ लिहून देण्याचें नाकारलें, तेव्हां काळजींत पडलेल्या लोकमान्यांनी, कोल्हटकरांच्या सूचनेनुसार, भाऊजींना तावडतोब पुण्यास बोलावून घेऊन करणग्रंथरचनेची बिकट कामगिरी त्यांच्यावर सोपविली व त्याकरिता ठरलेलें पंचांगप्रवर्तन कमिटीचें १००० रु. चें बक्षीसहि त्यांना दिलें.

पण, १९१८ मध्ये लिहून तयार असलेला प्रस्तुत प्रबंध प्रसिद्ध होण्याचा योग मात्र टिळकांच्या मृत्यूनंतर नऊ वर्षांनी आला. नागपूर अकॅडेमीने प्रस्तुत ग्रंथाला १५० रु. चें बक्षीस देऊन त्याचा गौरव केला होता.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करण कल्पलता

[प्रकाशन: १९२५]

भाऊजींना भारतीय कीर्ति मिळण्याचा योग त्यांनी लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेवरून लिहिलेल्या " करण कल्पलते " नेच आला. ' भारतीय ज्योतिःशास्त्र-निरीक्षणां'त भारतीय व पाश्चात्य ज्योतिःशास्त्रांतील सिद्धांतांचा भाऊजींनी जो समन्वय केला, त्याप्रमाणे शुद्ध पंचांगाचें गणित करण्याच्या नव्या रीति, दोन तीन कोष्टकगणकांच्या व अनेक कोष्टकांच्या साहाय्याने भाऊजींनी ह्यांत शोधून काढल्या आहेत. ह्या रीतीवरून येणारे ग्रह व नाटिकल आल्मानकचे ग्रह यांत १।२ कलांपेक्षा जास्त अंतर नाही.

लोकमान्यांच्या मृत्यूनंतर पांच वर्षांनी १० जानेवारी १९२५ रोजी प्रसिद्ध झालेला आपला हा अपूर्व ग्रंथ भाऊजींनी अत्यंत हृदयस्पर्शी शब्दांनी त्यांना कृतज्ञतापूर्वक अर्पण केला आहे. या लोकोत्तर ग्रंथाचें स्वागत करतांना कै. दादासाहेब ओगले यांनीं ' नवीन केशवदैवज्ञ ' अशा अत्यंत मार्मिक अभिधेने भाऊजींचा गौरव केला होता.

करण कल्पलता (उत्तरार्ध)

[लेखक १९२५, अप्रकाशित]

करणकल्पलतेच्या या अप्रकाशित उत्तरार्धांत उच्च प्रकारच्या ज्योतिर्गणिताचें भाऊजींनी विवेचन केलें आहे छायागणित, चंद्रशृंगोन्नति, बुधशुक्रकृतसूर्याक्रमण, करणकल्पलतेंतील रीतींची उपपत्ति वगैरे प्रस्तुत प्रबंधांतील प्रकरणें म्हणजे भाऊजींच्या प्रखर बुद्धिमत्तेच्या जलाशयांतून आविर्भूत झालेलीं रत्नेंच होत. पण या रत्नांच्या प्रभेनें ज्योतिर्गणिताचें अंतरंग उजळून निघण्याचा योग अजून तरी आला नाही.

पंचांगचंद्रिका

[प्रकाशन: १९३१]

' करणकल्पलते ' तील तिथिनक्षत्रयोगांचें गणित फारच क्लिष्ट असल्यामुळे त्यावरून आधुनिक पद्धतीचें सूक्ष्म पंचांगगणित करण्यास बरेच श्रम पडत. ही अडचण दूर करून तिथिनक्षत्रयोगांच्या गणितांत सोपेपणा आणण्याकरिता भाऊजींनी १९३१ मध्यें प्रस्तुत प्रबंध लिहून प्रसिद्ध केला.

ह्या ग्रंथांत भाऊजींनी एक नवीन समीकरण तयार केलें. त्यामुळे केरोपंतांच्या पंचांगसाधनकोष्टकापेक्षा किंवा ज्योतिर्विद् केतकरांच्या वैजयंती पेक्षा देखील ह्यांत अधिक सूक्ष्मता आली आहे. प्रस्तुत ग्रंथांत गणेशदैवज्ञाच्या तिथिचिंतामणि प्रमाणे अनेक कोष्टकांचा अवलंब केला असून त्यामुळे स्पष्ट चंद्रसूर्य काढल्या शिवाय एकदम स्पष्ट तिथ्यंतकाळहि अत्यंत सूक्ष्मतेने काढतां येतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९५१
मार्च

धर्मरहस्य

[लेखन १९१८ प्रकाशन १९२६]

बंगालच्या फाळणीमुळे अखिल भारतवर्षात असंतोषाच्या ज्वाळा उफाळल्या पण, राजकारणाचें अधिष्ठान लाभूनहि ही प्रचंड लाट लवकरच विलीन झाली. देशभक्तीच्या या लाटेबरोबर वाहवत गेलेल्या भाऊजींनी आपल्या तीक्ष्ण अंतर्भेदि बुद्धीचा प्रकाशकिरण त्यावर टाकून, लोकांना वास्तविक धर्माचें ज्ञान करून देण्यासाठी धर्मग्रंथांचा अभ्यास सुरू केला.

गीर्वाणग्रंथाच्या सूक्ष्म अभ्यासांतून आविर्भूत झालेले भाऊजींचे ' धर्मरहस्य ' ' धर्मविवाद स्वरूप ' व "जैमिन्यर्थदीपिका" हे तीन क्रांतिकारक व आपल्या उदार धर्माचें सर्वांगीण दर्शन घडविणारे नावीन्यपूर्ण ग्रंथ म्हणजे धर्म परिवर्तनाचें तत्व मान्य असणाऱ्या नवमतवादी धर्मनिष्ठांची 'प्रस्थानत्रयी'च होय.

ह्या ग्रंथांत इहलोकीं म्हणजे मरणापूर्वीच आत्यंतिक आनंदाची प्राप्ति करून देणें हेंच धर्माचें खरें रहस्य होय असें क्रांतिकारक मत भाऊजींनी प्रतिपादन केलें आहे. सनातनी पंडितांच्या मताप्रमाणे परलोकांतील सुखाचीं साधनें मनुष्यबुद्धीस अगम्य आहेत. त्यामुळे वेदोपनिषदांवर सर्वांनी पूर्ण विश्वास ठेवून ' नमो ऋषिभ्यः मंत्रकृद्भ्यः ' या न्यायाने वेदांत यत्किंचितहि बदल करण्याचा विचार त्यांनी मनांतहि आणूं नये. म्हणून, त्यांच्या मताप्रमाणे, धर्म बुद्धिगम्य नाही. अर्थात् धर्मात बदल करण्याचा मनुष्यास यत्किंचितहि अधिकार नाही.

पण भाऊजींनी जुन्याच धर्मग्रंथांतील वचनांच्या आधाराने प्रस्तुत मत खोडून काढलें आहे.

> यदा भावेन भावति सर्वं भावेषु निःस्पृहः ।
> तदा सुखमवाप्नोति प्रेत्य चेह च शाश्वतम् ॥

या मनुस्मृतींतील वचनांत निःस्पृह मनुष्यालाच ऐहिक व पारलौकिक शाश्वत सुख प्राप्त होतें असें सांगितलें आहे. 'अनुशासनपर्वांत'हि जितेंद्रिय व ' एकात्मप्रत्ययसारं ' अशा भावनेने वागणाऱ्या मनुष्याला मृत्यूनंतर आत्यंतिक सुखाची प्राप्ति होते असें सांगितलें आहे. (अनुशासनपर्व, १७५,६)

इहलोकांतील सुखाचीं साधनें मुख्यत: दोन आहेत. (१) वासनाक्षय-ब्रह्म म्हणजे वासनाभावरूपी परमानंद (२) ' एकात्म प्रत्ययसार ' या भावनेची जागती जाणीव या दोन गोष्टीमुळे मनुष्याला इहलोकीं तर सुख होईलच, पण परलोकींहि आत्यंतिक सुखाची प्राप्ति होईल.

भगवद्गीतेंतहि, निःस्पृह कर्म चरणाने इहलोकीं प्राप्त होणाऱ्या ब्राह्मी स्थितीचें वर्णन करून ' स्थित्वास्यां अंतकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति ' म्हणजे अंतकालींहि या स्थितींत राहिल्याने ब्रह्मनिर्वाणास म्हणजे मृत्यूनंतरच्या आत्यंतिक आनंदाच्या स्थितीस मनुष्य प्राप्त होतो.]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सनातनी पंडितांचा बालेकिल्ला असलेल्या ' अपौरुषेय ' वेदांतहि सांगितलें आहे—'यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा येऽस्यहृदि स्थिता : । अथ मर्त्योऽमृतो भवत्यत्र ब्रह्म समश्नुते'

' अत्र ब्रम्ह समश्नुते ' – (जिवंतपणीच आत्यंतिक आनंदाची प्राप्ति)– हाच भाऊजींचाहि सिद्धान्त आहे. पूर्वीच्या ग्रंथांत मृत्यूनंतरच्या मुक्तीचें प्रतिपादन आहे, पण भाऊजींच्या ग्रंथात आहे जीवनमुक्तीचें प्रतिपादन !–

' प्रवर्तयन्ति वेदांश्च भुवि सप्तर्षयो द्विजा : ' या अग्निपुराणांतील वचनांत ' ब्राह्मण असलेले सप्तर्षि वेद प्रवृत्त करतात असें स्पष्ट म्हटलें आहे. ' प्रवर्तयंति ' याचा अर्थ स्वतःच वेद करणें असा नसून दुसऱ्यांनी केलेले ग्रंथ पसंत करून त्यांचा वेदांत अंतर्भाव करणें असाहि होतो आणि हाच अर्थ भाऊजींना अभिप्रेत आहे.

प्रत्येक मन्वंतराच्या शेवटी मनु व सप्तर्षि एकाग्र मनाने चिंतन करून (तपोविध्दि) वेद प्रवृत्त करीत. धर्माधर्माचा निर्णय करावयाचा असला, धर्मासंबंधी नवीन नियम घालून द्यावयाचे असले किंवा वर्णांतराला धार्मिक अधिष्ठान प्राप्त करून द्यावयाचें असलें तर प्रत्येक मन्वंतराच्या शेवटी सात मनु व एक सप्तर्षी अशी आठ जणांची बैठक होऊन तेथे दीर्घ चर्चेनंतर एकमताने ठराव पास करण्यात येई.

अर्थात, हे मनुसप्तर्षी जें ठरवीत, त्याचा अंतर्भाव ' स्मृतींतच ' होत असे. प्राचीन धर्मग्रंथांत गौतम, वशिष्ठ, बौधायन, आपस्तंब इत्यादि स्मृतिग्रंथांचाच भरणा जास्त असावा याचेंहि मर्म झालें तरी हेंच होय. (पुराणांत अशी एकंदर चवदा मन्वंतरें सांगितलीं आहेत.)

त्या मनुसप्तर्षींना वर्णांतराला मान्यता देण्याचाहि अधिकार होता. शकपूर्व ३१८० म्हणजे खिस्तपूर्व ३१०२ या काळीं आनंद नांवाच्या ब्रम्हदेवाने म्हणजेच त्या वेळच्या सर्वश्रेष्ठ अधिकाऱ्याने, समाजाच्या हिताकरिता, वर्णव्यवस्था सुरू केली व नवीन जन्मलेल्या मुलांची निरनिराळ्या वर्णांत भरति करण्याकारिता मनुसप्तर्षि नांवाचे अधिकारीहि त्यानेच निर्माण केले. सर्व लोकांतून निवड करून सप्तर्षी कांहीस ब्राम्हण ठरवीत व मनु क्षत्रिय व वैश्य वर्गात नवीन भरती करीत. बाकीचे, अर्थातच, शूद्र समजले जात. अशा वेळीं, कांही खालच्या वर्णांतील लोक वरच्या वर्णांत घातले जात व कांही वरच्या वर्णांतील लोक खालच्या वर्णांत घातले जात. म्हणजे वर्णोत्कर्षापकर्ष होत असे.

पुढे रैवत मनूने ह्या व्यवस्थेंत थोडा बदल केला. वर्ण जन्मावरून ठरविले जावे असा नियम त्याने केला. व ह्याहि व्यवस्थेंत पुढे चाक्षुप, वैवस्वत वगैरे सहा मनूंनी वेळोवेळीं बदल केला.

' धर्मरहस्यां 'तील विवेचनाचें स्वरूप थोडक्यांत असें आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९५१
मार्च

भाऊजींच्या प्रस्तुत ग्रंथाने सनातनी मंडळींत खूपच खळबळ उडविली. त्यावर टीका प्रतिटीकाहि पुष्कळ झाल्या. प्रा. न. र. फाटक प्रभृतींनी भाऊजींना मुद्दाम पत्रें पाठवून प्रस्तुत ग्रंथाबद्दल त्यांचें अभिनंदनहि केलें होतें. या ग्रंथाच्या वाचनानेच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, तर्कसांख्यतीर्थ रघुनाथशास्त्री कोकजे, प्रभृति विद्वानांच्या अंतरंगांत धर्माच्या स्वरुपाबद्दल अभिनव प्रकाश पडून त्याचा परिणाम ' धर्मनिर्णय मंडळा 'च्या स्थापनेंत झाला.

धर्मविवादस्वरूप

[प्रकाशनकाल १९४०]

भाऊजींच्या ' धर्मरहस्या 'ने धर्मशास्त्राचा विचार करणारांत जे दोन पक्ष पाडले होते, त्या दोन्ही पक्षांचें स्वरूप समजावून घेऊन वाचकांना योग्य निर्णय करतां येईल अशा रीतीने भाऊजींनी प्रस्तुत ग्रंथ लिहिला आहे. ' धर्मरहस्या 'ने प्रवृत्त केलेल्या वादांचाहि यांत भाऊजींनी पूर्ण ऊहापोह केला आहे.

या ग्रंथांत भाऊजींनी वेदांचें अपौरुषेयत्व, कर्मसंन्यास आणि बुद्धिप्रामाण्य या विषयांवर विशेष भर दिला आहे.

ग्रंथकर्त्यांचें स्मरण नसणें, ग्रंथांत परलोकच्या सुखाचीं साधनें सांगितलेलीं असणें, ग्रंथाची भाषा विचित्र असणें वगैरे कारणांनी वेदांचें अपौरुषेयत्व सिद्ध होऊं शकत नाही असें भाऊजींनी यांत सप्रमाण दाखवून दिलें आहे.

मनुसतर्षी हे त्या काळचे सर्वांत श्रेष्ठ पुरुष असले तरी, श्रेष्ठ पुरुषांच्याहि हातून, अजाणता कां होईना, चुका होतातच. शिवाय, त्यांनी सांगितलेले धर्म त्यांच्या काळांत सुखकर असले तरी, ते नवीन परिस्थितीत दुःखकर होत असल्यास त्यांत बदल करणें अपरिहार्य आहे. ' यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ' या प्रसिद्ध वेदवचनांतूनहि हाच अर्थ स्पष्ट होतो. म्हणून मनुसतर्षीप्रमाणे, धर्म सांगण्याच्या अधिकारावर नेमल्या गेलेल्या पुरुषांनी धर्म सांगावा व इष्ट वाटल्यास जुन्या धर्मांत बदलहि करावा ' असा सिद्धान्त भाऊजींनी प्रतिपादन केला आहे. हिंदू समाजाचें पुनरुत्थान व्हायचें असेल तर मनुसतर्षी-सारखी संस्था पुन्हा स्थापन करून त्या संस्थेच्या निर्णयाप्रमाणे सर्वांनी वागावें हाच भाऊजींच्या धर्मविषयक विचारांचा इत्यर्थ आहे.

ईशावास्योपनिषदांत ' कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतं समाः ' असें सांगितलें असतांहि व त्यांतच पुढे

" अधं तमः प्रविशंति येऽविद्यामुपासते
ततोऽभूय इव ते तमो य अविद्यायां रताः ॥ "

असें म्हटलें असतांहि कर्मसंन्यासाचें मत कांही उपनिषद्कारांनी सुरू केलें व तें दृढ करण्यास गौतम बुद्ध तर असोच, पण बौद्धांचा पराजय करणारे, ' शंक

करण कल्पलता

[प्रकाशन: १९२५]

भाऊजींना भारतीय कीर्ति मिळण्याचा योग त्यांनी लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेवरून लिहिलेल्या " करण कल्पलते " नेच आला. ' भारतीय ज्योतिःशास्त्र-निरीक्षणां'त भारतीय व पाश्चात्य ज्योतिःशास्त्रांतील सिद्धातांचा भाऊजींनी जो समन्वय केला, त्याप्रमाणे शुद्ध पंचांगाचें गणित करण्याच्या नव्या रीति, दोन तीन कोष्टकगणकांच्या व अनेक कोष्टकांच्या साहाय्याने भाऊजींनी ह्यांत शोधून काढल्या आहेत. ह्या रीतीवरून येणारे ग्रह व नाटिकल आल्मानकचे ग्रह यांत १।२ कलांपेक्षा जास्त अंतर नाही.

लोकमान्यांच्या मृत्यूनंतर पांच वर्षानी १० जानेवारी १९२५ रोजी प्रसिद्ध झालेला आपला हा अपूर्व ग्रंथ भाऊजींनी अत्यंत हृदयस्पर्शी शब्दांनी त्यांना कृतज्ञतापूर्वक अर्पण केला आहे. या लोकोत्तर ग्रंथाचें स्वागत करतांना कै. दादासाहेब ओगले यांनीं ' नवीन केशवदैवज्ञ ' अशा अत्यंत मार्मिक अभिधेने भाऊजींचा गौरव केला होता.

करण कल्पलता (उत्तरार्ध)

[लेखक १९२५, अप्रकाशित]

करणकल्पलतेच्या या अप्रकाशित उत्तरार्धात उच्च प्रकारच्या ज्योतिर्गणिताचें भाऊजींनी विवेचन केलें आहे छायागणित, चंद्रशृंगोन्नति, बुधशुक्र-कृतसूर्याक्रमण, करणकल्पलतेंतील रीतींची उपपत्ति वगैरे प्रस्तुत प्रबंधांतील प्रकरणें म्हणजे भाऊजींच्या प्रखर बुद्धिमत्तेच्या जलाशयांतून आविर्भूत झालेलीं रत्नेंच होत. पण या रत्नांच्या प्रभेनें ज्योतिर्गणिताचें अंतरंग उजळून निघण्याचा योग अजून तरी आला नाही.

पंचांगचंद्रिका

[प्रकाशन: १९३१]

' करणकल्पलते ' तील तिथिनक्षत्रयोगांचें गणित फारच क्लिष्ट असल्यामुळे त्यावरून आधुनिक पद्धतीचें सूक्ष्म पंचांगगणित करण्यास बरेच श्रम पडत. ही अडचण दूर करून तिथिनक्षत्रयोगांच्या गणितांत सोपेपणा आणण्याकरिता भाऊजीनी १९३१ मध्यें प्रस्तुत प्रबंध लिहून प्रसिद्ध केला.

ह्या ग्रंथांत भाऊजींनी एक नवीन समीकरण तयार केलें. त्यामुळे केरो-पंतांच्या पंचांगसाधनकोष्टकापेक्षा किंवा ज्योतिर्विद् केतकरांच्या वैजयंती पेक्षा देखील ह्यांत अधिक सूक्ष्मता आली आहे. प्रस्तुत ग्रंथांत गणेशदैवज्ञाच्या तिथि-चिंतामणि प्रमाणे अनेक कोष्टकांचा अवलंब केला असून त्यामुळे स्पष्ट चंद्रसूर्य काढल्या शिवाय एकदम स्पष्ट तिथ्यंतकाळहि अत्यंत सूक्ष्मतेने काढतां येतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९५१
मार्च

धर्मरहस्य

[लेखन १९१८ प्रकाशन १९२६]

बंगालच्या फाळणीमुळे अखिल भारतवर्षात असंतोषाच्या ज्वाळा उफाळल्या पण, राजकारणाचें अधिष्ठान लाभूनहि ही प्रचंड लाट लवकरच विलीन झाली. देशभक्तीच्या या लाटेबरोबर वाहवत गेलेल्या भाऊजींनी आपल्या तीक्ष्ण अंतर्भेदि बुद्धीचा प्रकाशकिरण त्यावर टाकून, लोकांना वास्तविक धर्माचें ज्ञान करून देण्यासाठी धर्मग्रंथांचा अभ्यास सुरू केला.

गीर्वाणग्रंथाच्या सूक्ष्म अभ्यासांतून आविर्भूत झालेले भाऊजींचे ' धर्मरहस्य ' ' धर्माविवाद स्वरूप ' व "जैमिन्यर्थदीपिका" हे तीन क्रांतिकारक व आपल्या उदार धर्माचें सर्वांगीण दर्शन घडविणारे नावीन्यपूर्ण ग्रंथ म्हणजे धर्म परिवर्तनाचें तत्व मान्य असणाऱ्या नवमतवादी धर्मनिष्ठांची 'प्रस्थानत्रयी'च होय.

ह्या ग्रंथांत इहलोकीं म्हणजे मरणापूर्वीच आत्यंतिक आनंदाची प्राप्ति करून देणें हेंच धर्माचें खरें रहस्य होय असें क्रांतिकारक मत भाऊजींनी प्रतिपादन केलें आहे. सनातनी पंडितांच्या मताप्रमाणे परलोकांतील सुखाचीं साधनें मनुष्यबुद्धीस अगम्य आहेत. त्यामुळे वेदोपनिषदांवर सर्वांनी पूर्ण विश्वास ठेवून ' नमो ऋषिभ्यः मंत्रकृद्भ्यः ' या न्यायाने वेदांत यत्किंचितहि बदल करण्याचा विचार त्यांनी मनांतहि आणूं नये. म्हणून, त्यांच्या मताप्रमाणे, धर्म बुद्धिगम्य नाही. अर्थात् धर्मात बदल करण्याचा मनुष्यास यत्किंचितहि अधिकार नाही.

पण भाऊजींनी जुन्याच धर्मग्रंथांतील वचनांच्या आधाराने प्रस्तुत मत खोडून काढलें आहे.

यदा भावेन भावति सर्व भावेषु निःस्पृहः ।
तदा सुखमवाप्नोति प्रेत्य चेह च शाश्वतम् ॥

या मनुस्मृतींतील वचनांत निःस्पृह मनुष्यालाच ऐहिक व पारलौकिक शाश्वत सुख प्राप्त होतें असें सांगितलें आहे. 'अनुशासनपर्वांत'हि जितेंद्रिय व ' एकात्मप्रत्ययसारं ' अशा भावनेने वागणाऱ्या मनुष्याला मृत्यूनंतर आत्यंतिक सुखाची प्राप्ति होते असें सांगितलें आहे. (अनुशासनपर्व, १७५,६)

इहलोकांतील सुखाचीं साधनें मुख्यत: दोन आहेत. (१) वासनाक्षय-ब्रह्म म्हणजे वासनाभावरूपी परमानंद (२) ' एकात्म प्रत्ययसार ' या भावनेची जागती जाणीव या दोन गोष्टीमुळे मनुष्याला इहलोकीं तर सुख होईलच, पण परलोकीहि आत्यंतिक सुखाची प्राप्ति होईल.

भगवद्गीतेंतहि, निःस्पृह कर्म चरणाने इहलोकीं प्राप्त होणाऱ्या ब्राह्मी स्थितीचें वर्णन करून ' स्थित्वास्यां अंतकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति ' म्हणजे अंतकालींहि या स्थितींत राहिल्याने ब्रह्मनिर्वाणास म्हणजे मृत्यूनंतरच्या आत्यंतिक आनंदाच्या स्थितीस मनुष्य प्राप्त होता असें स्पष्ट म्हटलें आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सनातनी पंडितांचा बालेकिल्ला असलेल्या ' अपौरुषेय ' वेदांतहि सांगितलें आहे—'यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा येऽस्यहृदि स्थिता : । अथ मर्त्योऽमृतो भवत्यत्र ब्रह्म समश्नुते'

' अत्र ब्रम्ह समश्नुते ' – (जिवंतपणीच आत्यंतिक आनंदाची प्राप्ति)– हाच भाऊजींचाहि सिद्धान्त आहे. पूर्वीच्या ग्रंथांत मृत्यूनंतरच्या मुक्तीचें प्रतिपादन आहे, पण भाऊजींच्या ग्रंथात आहे जीवनमुक्तीचें प्रतिपादन !–

' प्रवर्तयन्ति वेदांश्च भुवि सप्तर्षयो द्विजा : ' या अग्निपुराणांतील वचनांत ' ब्राह्मण असलेले सप्तर्षि वेद प्रवृत्त करतात असें स्पष्ट म्हटलें आहे. ' प्रवर्तयंति ' याचा अर्थ स्वतःच वेद करणें असा नसून दुसऱ्यांनी केलेले ग्रंथ पसंत करून त्यांचा वेदांत अंतर्भाव करणें असाहि होतो आणि हाच अर्थ भाऊजींना अभिप्रेत आहे.

प्रत्येक मन्वंतराच्या शेवटी मनु व सप्तर्षि एकाग्र मनाने चिंतन करून (तपोसिद्धि) वेद प्रवृत्त करीत. धर्माधर्मांचा निर्णय करावयाचा असला, धर्मासंबंधी नवीन नियम घालून द्यावयाचे असले किंवा वर्णांतराला धार्मिक अधिष्ठान प्राप्त करून द्यावयाचें असलें तर प्रत्येक मन्वंतराच्या शेवटी सात मनु व एक सप्तर्षी अशी आठ जणांची बैठक होऊन तेथे दीर्घ चर्चेनंतर एकमताने ठराव पास करण्यात येई.

अर्थात, हे मनुसप्तर्षी जें ठरवीत, त्याचा अंतर्भाव ' स्मृतींतच ' होत असे. प्राचीन धर्मग्रंथांत गौतम, वशिष्ठ, बौधायन, आपस्तंब इत्यादि स्मृतिग्रंथांचाच भरणा जास्त असावा याचेंहि मर्म झालें तरी हेंच होय. (पुराणांत अशी एकंदर चवदा मन्वंतरें सांगितलीं आहेत.)

त्या मनुसप्तर्षींना वर्णांतराला मान्यता देण्याचाहि अधिकार होता. शकपूर्व ३१८० म्हणजे ख्रिस्तपूर्व ३१०२ या काळीं आनंद नांवाच्या ब्रम्हदेवाने म्हणजेच त्या वेळच्या सर्वश्रेष्ठ अधिकाऱ्याने, समाजाच्या हिताकरितां, वर्णव्यवस्था सुरू केली व नवीन जन्मलेल्या मुलांची निरनिराळ्या वर्णांत भरति करण्याकरिता मनुसप्तर्षि नांवाचे अधिकारीहि त्यानेच निर्माण केले. सर्व लोकांतून निवड करून सप्तर्षी कांहींस ब्राम्हण ठरवीत व मनु क्षत्रिय व वैश्य वर्गांत नवीन भरती करीत. बाकीचे, अर्थातच, शूद्र समजले जात. अशा वेळीं, कांही खालच्या वर्णांतील लोक वरच्या वर्णांत घातले जात व कांही वरच्या वर्णांतील लोक खालच्या वर्णांत घातले जात. म्हणजे वर्णोत्कर्षापकर्ष होत असे.

पुढे रैवत मनूने ह्या व्यवस्थेंत थोडा बदल केला. वर्ण जन्मावरून ठरविले जावे असा नियम त्याने केला. व ह्याहि व्यवस्थेंत पुढे चाक्षुष, वैवस्वत वगैरे सहा मनूंनी वेळोवेळीं बदल केला.

' धर्मरहस्यां 'तील विवेचनाचें स्वरूप थोडक्यांत असें आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भाऊजींच्या प्रस्तुत ग्रंथानें सनातनी मंडळींत खूपच खळबळ उडविली. त्यावर टीका प्रतिटीकाहि पुष्कळ झाल्या. प्रा. न. र. फाटक प्रभृतींनी भाऊजींना मुद्दाम पत्रें पाठवून प्रस्तुत ग्रंथाबद्दल त्यांचें अभिनंदनहि केलें होतें. या ग्रंथाच्या वाचनानेंच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, तर्कसांख्यतीर्थ रघुनाथशास्त्री कोकजे, प्रभृति विद्वानांच्या अंतरंगांत धर्माच्या स्वरूपाबद्दल अभिनव प्रकाश पडून त्याचा परिणाम 'धर्मनिर्णय मंडळा'च्या स्थापनेंत झाला.

धर्मविवादस्वरूप

[प्रकाशनकाल १९४०]

भाऊजींच्या 'धर्मरहस्या'ने धर्मशास्त्राचा विचार करणारांत जे दोन पक्ष पाडले होते, त्या दोन्ही पक्षांचें स्वरूप समजावून घेऊन वाचकांना योग्य निर्णय करतां येईल अशा रीतीने भाऊजींनी प्रस्तुत ग्रंथ लिहिला आहे. 'धर्मरहस्या'ने प्रवृत्त केलेल्या वादांचाहि यांत भाऊजींनी पूर्ण ऊहापोह केला आहे.

या ग्रंथांत भाऊजींनी वेदांचें अपौरुषेयत्व, कर्मसंन्यास आणि बुद्धिप्रामाण्य या विषयांवर विशेष भर दिला आहे.

ग्रंथकर्त्याचें स्मरण नसणें, ग्रंथांत परलोकच्या सुखाचीं साधनें सांगितलेलीं असणें, ग्रंथाची भाषा विचित्र असणें वगैरे कारणांनी वेदांचें अपौरुषेयत्व सिद्ध होऊं शकत नाही असें भाऊजींनी यांत सप्रमाण दाखवून दिलें आहे.

मनुसतर्षी हे त्या काळचे सर्वांत श्रेष्ठ पुरुष असले तरी, श्रेष्ठ पुरुषांच्याहि हातून, अजाणता कां होईना, चुका होतातच. शिवाय, त्यांनी सांगितलेले धर्म त्यांच्या काळांत सुखकर असले तरी, ते नवीन परिस्थितींत दुःखकर होत असल्यास त्यांत बदल करणें अपरिहार्य आहे. 'यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन्' या प्रसिद्ध वेदवचनांतूनहि हाच अर्थ स्पष्ट होतो. म्हणून मनुसतर्षीप्रमाणे, धर्म सांगण्याच्या अधिकारावर नेमल्या गेलेल्या पुरुषांनी धर्म सांगावा व इष्ट वाटल्यास जुन्या धर्मांत बदलहि करावा' असा सिद्धान्त भाऊजींनी प्रतिपादन केला आहे. हिंदू समाजाचें पुनरुत्थान व्हावयाचें असेल तर मनुसतर्षी-सारखी संस्था पुन्हा स्थापन करून त्या संस्थेच्या निर्णयाप्रमाणे सर्वांनी वागावें हाच भाऊजींच्या धर्मविषयक विचारांचा इत्यर्थ आहे.

ईशावास्योपनिषदांत 'कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतं समाः' असें सांगितलें असतांहि व त्यांतच पुढे

"अंधं तमः प्रविशंति येऽविद्यामुपासते
ततोऽभूय इव ते तमो य अविद्यायां रताः ॥"

असें म्हटलें असतांहि कर्मसंन्यासाचें मत कांही उपनिषद्कारांनी सुरूं केलें व तें दृढ करण्यास गौतम बुद्ध तर असेच, पण बौद्धांचा पराजय करणारे, 'ब्रह्मचर्या-देव प्रव्रजेता' म्हणणारे श्रीमच्छंकराचार्यहि कारणीभूत झाले. त्यामुळेच देश

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परतंत्र, अज्ञानी व निर्धन बनला. खरें ब्रह्मज्ञानहि लोकांजवळ राहिलें नाही. यापेक्षा अधिक घात तो कोणता !

अर्थात जिवंत, राहण्याकरिता कर्म व वासना किंवा आसक्तित्यागाकरिता ज्ञान या दोहोंचीहि आवश्यकता आहे. म्हणून, ज्ञानकर्मसमुच्चयाचा मार्गच भारताची आध्यात्मिक उन्नति करूं शकेल अशी भाऊजींची निष्ठा आहे.

भाऊजी धर्माधर्मनिर्णयांत बुद्धीलाच प्राधान्य देतात. बुद्धीला मान्य न होणारी कुठलीच गोष्ट धर्मालाहि मान्य होऊं शकत नाही असें त्यांचें स्पष्ट मत आहे. धर्मांतील वाद मिटवावयाचे असतील तर आज ग्रंथप्रधान असलेलें धर्मशास्त्र बुद्धिप्रधान झालें पाहिजे. स्वप्न साक्षात्कार किंवा आकाशवाणी यांची देखील उपपत्ति भाऊजी बुद्धिकार्यांतूनच लावतात. त्यामुळे बुद्धीला न पटणारी कुठलीहि कल्पना भाऊजींना मान्य होऊं शकत नाही. ते म्हणतातः-" जगताहून व अर्थात भक्ताहून भिन्न व भक्ताची इच्छा पुरविण्याकरिता आपल्याच जगाचें नियमन करणाऱ्या नियमांचा भंग करणारा असा ईश्वर कोणाहि बुद्धिमान मनुष्यास मान्य होणार नाही, व आम्हासहि मान्य नाही. " प्रस्तुत ग्रंथाला त्या वर्षातील उत्कृष्ट ललितेतर ग्रंथ म्हणून दक्षिण महाराष्ट्र साहित्य परिषदेने ५०० रु.चें बक्षीस दिलें होतें.

जैमिन्यर्थ दीपिका

[प्रकाशन : १९४०]

ज्यांत धर्माचा विचार शास्त्रीय पद्धतीने, व्यवस्थितपणे व पूर्णपणे केला आहे असा एकमेव ग्रंथ म्हटला म्हणजे " जैमिनीय सूत्रें होत " असें भाऊजींचें मत आहे. पण शबरस्वामींनी जैमिनीच्या या सुंदर सूत्रांवर भाष्य लिहितांना त्यांतील अर्थाचा विपर्यास करून जैमिनीची सुंदर कृति छिन्नभिन्न करून टाकली आहे. त्यामुळेच भारतीयांच्या धर्मकल्पना फार विकृत झाल्या. श्रीकुमारिलभट्टांनी व त्यानंतरच्या सर्व निबंधकारांनी त्या भाष्यांतील विचारांची वाढ करून भारतीयांच्या धर्मकल्पना अधिकाधिक हानिकारक अवस्थेला पोंचविल्या. म्हणून जैमिनीय सूत्राच्या खऱ्या अर्थाचें प्रतिपादन करून चोदनालक्षणधर्माचें वास्तविक ज्ञान लोकांना करून देण्यासाठी भाऊजींनी जैमिनीच्या सूत्रांवर प्रस्तुत टीका लिहिली आहे.

प्राचीन धर्मग्रंथांवरील विपर्यस्त भाष्यांनी भांबावून गेल्यामुळे दिङ्मूढ झालेल्या धर्मबांधवांस भाऊजींच्या प्रस्तुत ग्रंथाने एक नवाच प्रकाश उपलब्ध करून दिला आहे.

वरील तीन ग्रंथ लिहून विद्वद्रत्नांनी ज्ञानमंदिराच्या एका नव्याच दालनांत प्रवेश केला. पण, कुठल्याहि मंदिरांतील बाह्यसौंदर्य पाहून देहभान विसरणें भाऊजींना कधी जमलेंच नाही. बुद्धीचा प्रकाशझोत देवाच्या मूर्तीवर पाडून,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तिच्यावरील झेंदराची पुटें नाहीशी करून, देवमूर्तीचें तेजस्वी पुनरदर्शन घडविणारे ते शिल्पकार आहेत. वेदोपनिषदांच्या स्वर्गंगेंत ते नुसतें अवगाहनच करीत नाहीत, तर बुद्धीच्या लखलखीत खड्गाने प्रवाहांत लपलेल्या हिंस्त्र जलचरांचा निःपात करून ते मूळचा विशुद्ध प्रवाह अधिक निष्कंटहि करितात, त्यांच्या अंतरंगाच्या सिंहासनावर भाविकतेच्या भावड्या देवतेची प्रतिष्ठापना नाही, बुद्धिप्रामाण्यांतून निष्पन्न झालेल्या सत्य ज्ञानाच्या ईश्वराचेंच तेथे अधिष्ठान आहे. आणि म्हणूनच...
......पण लोकविलक्षण सिद्धान्तांचें प्रतिपादन करणाऱ्या कोणत्या प्रवर्तकाला समाजाने आजवर सहानुभूतीने वागविलें आहे !—

चिकित्सापरीक्षण

(लेखन, १९२४, अप्रकाशित)

भाऊजींच्या सूक्ष्मदर्शी प्रतिभेची झेंप आहे आणि युगापासून तों स्वतंत्र भारताच्या सुखसमृद्धीच्या कालापर्यंत त्यांच्या ग्रांथिक जीवनाच्या डोळ्यांचें नांव आहे जिज्ञासा व चिकित्सा......

या जिज्ञासेनेच अखेर भाऊजींना वैद्य बनविलें.

कायद्याचा अभ्यास करतांना स्वतःला झालेल्या अपचनाच्या व्यथेवर प्रयोग करतां करताच भाऊजींचें लक्ष वैद्यकशास्त्राकडे वळलें. लगेच त्यांनी आयुर्वेद, ॲलोपथी वगैरे निरनिराळ्या शास्त्रांवरील अनेक दुर्मिळ ग्रंथ मिळवून त्यांचा सूक्ष्म व सप्रयोग अभ्यास सुरूं केला.

या सर्वांगीण अभ्यासांतून व प्रदीर्घ चिंतनांतून १९११ मध्ये भाऊजींचा असा ठाम सिद्धांत झाला कीं, 'डॉ. शुस्लरने' शोधून काढलेली बायोकेमिस्ट्री किंवा बाराक्षारपद्धतीच भारताला नैसर्गिक आरोग्याचा पुनः प्रत्यय देऊं शकते.

अनेक वर्षांच्या अनुभवाने भाऊजींची बाराक्षारचिकित्सेतील प्रवीणता इतकी वाढली कीं, १९२० च्या असहकारितेच्या चळवळींत भाऊजींच्या प्राचार्यत्वाखाली निघालेल्या राष्ट्रीय महाविद्यालयांत (National Cllege) बायोकेमिस्ट्री शिकविण्याचें काम भाऊजींकडे आलें. तेथे, श्री. बा. द्यु. नांदुरकर नांवाच्या विद्यार्थ्याने विचारलेल्या प्रश्नांनी चालना मिळून भाऊजींनी 'चिकित्सापरीक्षण' नांवाचा ग्रंथ १९२४ च्या उन्हाळ्यांत लिहून काढला. द्रव्याभावामुळे तो प्रसिद्ध होऊं शकला नाही हा भाग वेगळा !

Bodily Reaction and Examination of Sustems of Therapeutics

(लेखन १९३८ प्रकाशन, १९४९)

पुढे १९३७ च्या सुमारास मुंबईचे सध्याचे आरोग्यमंत्रि डॉ. गिल्डर यांनी आयुर्वेदासंबंधी जें बिल मुंबई विधिमंडळांत आणलें होतें व त्यावरून

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भाऊजींचा त्यांच्याशी जो खटका उडाला होता त्यामुळे होमिओपथीची सर्वांगीण माहिती लोकांना कळावयास हवी असें भाऊजींना तीव्रतेने वाटूं लागलें. त्याचा परिपाक म्हणजेच 'चिकित्सापरीक्षणां'त सुधारणा करून व पुष्कळ नवीन माहिती घालून त्यांनी लिहिलेला प्रस्तुत ग्रंथ होय.

ह्या ग्रंथाचा मुख्य विशेष हा आहे की, त्यांत शरीरावर केलेल्या कोणत्याहि क्रियेची प्रतिक्रिया कशी घडते याचे नियम प्रतिपादून सिद्ध केले असून त्या नियमांच्या प्रकाशांत आयुर्वेद, ॲलोपथी, हैड्रोपथी, क्रोमोपथी, होमिओपथी, सायकोपथी, इलेक्ट्रोपथी व ऑरग्यानोपथी ह्या आठ चिकित्सापद्धतींचें परिक्षण केलें आहे. शिवाय, वैद्यकशास्त्रांत निर्माण होणाऱ्या अनेक कूट समस्यावरहि नवीन प्रकाश पाडला आहे.

ह्या ग्रंथांत हॅनिमानच्या Organan of medicine ह्या ग्रंथांतील अपूर्णता दूर केली असून सर्व प्रचलित चिकित्सापद्धतींचा समन्वय करून एकच सर्वंकष, सुकर आणि सुबोध अशी चिकित्सापद्धति कशी स्थापन करता येईल हेंहि सप्रमाण दाखविलें आहे.

सच्चिकित्साप्रकाशिका

(प्रकाशन १९३६)

Bodily Reaction या ग्रंथांत वैद्यकशास्त्राचें तत्वज्ञान आहे. त्यावरून निरनिराळ्या चिकित्सापद्धतींचें तौलनिक व होमिओपथीचें सूक्ष्म ज्ञान होईल हें खरें. पण बिमाराची प्रत्यक्ष चिकित्सा मात्र त्यावरून करता यावयाची नाही. ही उणीव भाऊजींनी 'सच्चिकित्साप्रकाशिका' या ग्रंथाने भरून काढली आहे.

प्रस्तुत ग्रंथाचें 'रहस्यवर्णन', 'रुग्णपरीक्षण' व 'लौकिकरोगचिकित्सा' असे तीन खंड असून 'रहस्यवर्णनां'त चिकित्सेचीं मूलतत्वें व बाराक्षारांचीं मुख्य चिन्हें समजावून सांगितलीं आहेत. शिवाय, चिकित्सा करतांना उद्भवणाऱ्या अनेक अडचणींचा परिहार करून शेवटी खाद्यपेयासंबंधी उपयुक्त अशी भरपूर व नावीन्यपूर्ण माहितीहि यांत दिली आहे.

'रुग्णपरीक्षणांत' रोग्यांची परीक्षा करण्याच्या सोप्या रीति दिलेल्या आहेत. व 'लौकिकरोगचिकित्सेंत' जात असलेल्या २५८ रोगांची माहिती देऊन 'रहस्यवर्णनां'तील नियमांनुसार त्यांची चिकित्सा कशी करावी हेंहि दाखविलें आहे. होमिओपॅथिक प्रॅक्टिशनरांचा प्रस्तुत ग्रंथ म्हणजे वेद आहे.

...भाऊजींना अपचनाच्या व्यथेने व्याकुळ केलें...

...त्यांची जिज्ञासा त्यांना स्वस्थ बसूं देईना...

....त्यांनी अनेक शास्त्रांतील अनेक ग्रंथाचें वाचन केलें, दीर्घकाल चिंतन केलें, अनेक वर्षे अनुभव घेतला...

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

...आणि बुद्धीचा संशयरहित निर्णय झाल्यावर...

...होमिओपॅथीवरील तीन वेद निर्माण केले...

...जगांतील वैद्यकशास्त्रांत मन्वंतर घडवून आणण्याचें सामर्थ्य असलेले भाऊजींचे क्रांतिकारक ग्रंथ...

...वैद्यकशास्त्राच्या मंथनांतून विद्वद्रत्नांनी प्रयासानें मिळविलेलीं व स्वतःच्या बुद्धीने पैलू पाडून अधिकच तेजस्वी केलेलीं अनमोल रत्नें....

...त्यांची प्रभा साऱ्या जगांत फांकायला हवी...

...पण....

...भारतांतील विद्यापीठें, सरकार, धनिकवर्ग, साहित्यसंस्था भाऊजींच्या या अपूर्व शोधांचा साक्षात्कार जगाला घडविण्याचें श्रेय संपादन करतील !...

The Astronomical Method & Its Application to the Chronology of Ancient India

(प्रकाशन, नागपूर विद्यापीठ, १९४१)

इ. स. १९१८ पासून आपल्या प्रतिभेच्या नवनवीन उन्मेषांनी महाराष्ट्र-शारदेचें ज्ञानभांडार समृद्ध नि तेजोमय करणाऱ्या विद्वद्रत्नांची १९३६ पर्यंत नागपूर विद्यापीठानें दखलहि घेतली नाही याबद्दल आश्चर्य जरी नव्हे तरी विषाद वाटल्याशिवाय कसा राहील ? त्यांच्या उग्र आणि एकाग्र ज्ञानोपासनेने नागपूर विद्यापीठ पुनित आणि भूषित व्हावें अशी अनन्यसाधारण योग्यता भाऊजींनी पूर्वीच संपादन केली होती पण...

अखेर १९३६ साली भाऊजींचे परमस्नेही डॉ. बारलींगे, आरोग्यमंत्री, यांनी 'महाभारतीययुद्धकालनिर्णय', 'वैदिककालगणनापद्धति', 'श्रीरामाचा जन्मकाळ' वगैरे प्राचीन विषयांवर ज्योतिर्गणिताचा अंतर्भेदी प्रकाश पाडून भाऊजींनी जें क्रांतिकारक व मूलगामी संशोधन केलें होतें, त्यांचें संकलन करून तें त्यांनी किनखेडे व्याख्यानमालेंतून विद्यापीठासमोर मांडावें अशी त्यांना विनंति केली.

—पण भाऊजींच्या आजारामुळे हा योग अधिक तीन वर्षे कांही आला नाही. शेवटीं, १३ ते १६ नोव्हेंबर १९४० रोजी भाऊजींनी किनखेडे व्याख्यान मालेंतून आपल्या क्रांतिकारक शोधांचा प्रत्यय विद्यापीठाला घडवून दिला व विद्यापीठानेंहि भाऊजींच्या क्रांतिकारक विचारसरणीवर व तर्कशुद्ध विवेचनशैलीवर खूष होऊन त्यांना सुवर्णपदक दिलें.

प्रस्तुत संकलनांतील 'कंसवधकालनिर्णय' हा निबंध फार महत्वाचा आहे. 'हरिवंशां'त कंसवधाच्या वेळची ग्रहस्थिति असंदिग्ध शब्दांत सांगितली आहे. त्यांत क्वचित् दिसणाऱ्या सूर्यग्रहणाचा स्पष्ट निर्देश आहे. भारतीययुद्धाचा काल ठरवितांना त्यापूर्वी सुमारें ४० वर्षे अगोदर झालेल्या खग्रास सूर्यग्रहणाचाहि भाऊजींनी प्रामुख्याने विचार केला होता. भाऊजींनी ठरविलेल्या युद्धकालाशी

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हरिवंशांतील ग्रहस्थिति उत्तम जुळते. म्हणून, कंसवध भारतीययुद्धापूर्वी ४० वर्षे अगोदर, म्हणजे शकपूर्व १२३५ या काळी झाला हें भाऊजींनी यांत सप्रमाण सिद्ध केलें आहे.

प्रस्तुत प्रबंधाने भारतीयांच्या अत्यंत प्राचीन म्हणजे मौर्यपूर्व इतिहासाच्या ज्ञानांतहि अत्यंत क्रांतिकारक भर घातली आहे. वराहकल्पाच्या आरंभी (इ. स. पूर्व ३१०२) आनंद नांवाच्या ऋषींने ब्रह्मदेव हें नांव धारण करून ब्रह्मर्षिदेशांत राज्य स्थापन केलें. त्याची भरभराट होऊन वैवस्वत मनूच्या काळांत तेथीलच लोक कुरुक्षेत्र, अयोध्या, प्रयाग, विहार वगैरे देशांत जाऊन राज्यें स्थापूं लागले. त्या राज्यांच्या भरभराटीबरोबर ब्रह्मर्षिदेशाचें महत्व कमी होणें अपरिहार्य होतें. तो मगध साम्राज्यांत विलीन झाला. ब्रम्हर्षि देशांतील अधिकाऱ्यांनाच ब्रह्मा, इंद्र, वायु, अग्नि, यम वगैरे नांवें होतीं 'वायुपुराणांत देवदानवांच्या युद्धांचें जें वर्णन आहे तें खरोखर या देशाच्या दोन पक्षांतील युद्धांचेंच वर्णन होय......"

Social Institutions in Ancient India
(प्रकाशक, नागपूर विद्यापीठ, १९४४)

त्यानंतर नागपूर विद्यापीठाने भाऊजींना Social Institutions in Ancient India' या विषयावर व्याख्यानें देण्याची विनंती केली. दहा व्याख्यानांची ही वाठोडकर व्याख्यानमाला भाऊजींनीं १९४४ मध्ये गुंफिली.

ह्यांत मनुसप्तर्षींचा इतिहास, त्यांचे अधिकार, तेव्हांची वर्णव्यवस्था, भारतीयांची प्राचीन विवाहपद्धति, आश्रमपद्धति, अश्वमेध आणि तेव्हाची राजकीय व्यवस्था यांचा शोधपूर्वक पूर्ण विचार केला आहे. राष्ट्रनिर्मात्यांत भाऊजींना स्थान मिळो न मिळो, पण स्वतंत्र भारतांतील हिंदू समाजाच्या सर्वांगीण प्रगतीची तळमळ लागलेल्या विचारवंतांना प्रस्तुत निबंधांत भाऊजींनी प्रतिपादन केलेल्या मतांचा विचार केल्याशिवाय पुढे पाऊल टाकतां येणार नाहीं, एवढें खास!

आणि असा विचार भाऊजींनीच आपल्या "स्वतंत्र भारताचा पुढील मार्ग" या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या निबंधसंग्रहांत पूर्णपणें केला आहे.*

उपनिषदांचा वस्तुनिष्ठ व बुद्धिगम्य अर्थ; व्याससूत्रें व The Realistic & Rationalistic Interpretation of the Upainshads
(अप्रकाशित)

'Astronomical method' व 'Social Institutions' ह्या विषयावर व्याख्यानें दिल्यावर त्यापेक्षाहि जास्त महत्त्वाच्या व स्वतंत्र भारताला आवश्यक अशा कोणत्या तरी विषयावर विद्यापीठाकरिता व्याख्यानें तयार करावीं असा विचार

* या ग्रंथाच्या माहिती करितां जिज्ञासूंनी १६।१०।१९५० च्या तरुण भारतांतील माझा परीक्षणलेख पहावा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भाऊजींच्या मनांत आला, व ह्याकरिता त्यांनी आपलें सर्व लक्ष उपनिषदांवर कॅंद्रित केलें. त्याकरिता त्यांनी

'ईश, केन, कठ, प्रश्न, मुंड माडूक्य, तित्तिरिः
एतरेयंच छांदोग्य बृहदारण्यकं...

या दहा व कौषीतकी अशा अकरा उपनिषदांचा कसून अभ्यास केला व १९४० च्या डिसेंबरपासून १९४७ च्या सरस्वत्यावाहनाच्या दिवसापर्यंत (२१ । ९ । ४७) सतत नऊ वर्षे अत्यंत परिश्रम करून सर्व उपनिषदांवर मराठी भाष्य लिहून काढलें. पण तेवढ्याने विषयाची पूर्तता होईना. तेव्हां व्याससूत्रांचाहि सूक्ष्म अभ्यास करून त्यांनी त्यावरहि मराठी भाष्य लिहिलें.

भाऊजींनी काढलेलें उपनिषदांचें सार असें आहे कीं, आपलाच आत्मा सर्व भूतांत आहे असें मानून सर्व भूतांच्या हिताकरिता मनुष्याने आमरण कर्मच करावें. कर्म करीत असतांना त्याला जिवंतपणींच आत्यंतिक आनंदाची प्राप्ति होते व हेंच धर्माचें साध्य आहे. इहलोकीं प्रत्येकाने असें वागावें म्हणूनच वैकुंठाच्या व मुक्ती कल्पना प्रसूत झाल्या आहेत. एरवीं, त्यांत यत्किंचित्‌देखील तथ्य नाही.

पूर्वीच्या ग्रथांत मृत्यूनंतरच्या मुक्तीचें प्रतिपादन आहे, भाऊजींच्या ग्रथांत आहे जीवन्मुक्तीचे प्रतिपादन ! आचार्यादिकांनी कर्मसंन्यासाचें प्रतिपादन केलें आहे, भाऊजींनी केलें आहे ज्ञानकर्मसमुच्चयाचें प्रतिपादन !

भक्तिवाद, मायावाद, संन्यासवाद, अवतारवाद, वेदापौरुषेयवाद वगैरे कल्पनांनी भरतखंडाचें किती अपरिमित नुकसान केलें हें भाऊजींनी प्रस्तुत प्रकाशित ग्रथांत निरपवाद सिद्ध केलें आहे.

शेवटीं, 'उपनिषदांचा वस्तुनिष्ठ व बुद्धिप्रत्ययक अर्थ' हा उपसंहारात्मक निबंध लिहून व त्याचेच 'The Realistic and Rationalistic Interpretation of The Upanisbadas' हें इंग्रजी भाषांतर करून भाऊजींनी विषयाची परिपूर्ति केली आहे.

विद्वद्रत्नांच्या प्रकाशित व अप्रकाशित ग्रंथरत्नांचा थोडक्यांत परामर्ष घेतला. याशिवाय, 'तात्विक मीमांसापद्धति', 'अस्पृश्यता कधी नष्ट होईल ?', 'श्रीरामाच्या वनवासाची रोजनिशी', 'व्यासांची शंकराचार्यांवर फिर्याद', 'वैद्यकसमन्वयाची रूपरेषा', 'राजतरंगिणीनिरिक्षण', 'भूमितीशास्त्राची मूलतत्वें' 'औषधिगुणादर्श' वगैरे कितीतरी प्रकाशित अप्रकाशित प्रबंध भाऊजींनी लिहिले आहेत.

आपल्या ग्रंथांविषयीं मतप्रदर्शन करतांना भाऊजी म्हणतातः—

"मी तयार केलेला करणग्रंथ प्रसिद्ध झाला तेव्हां माझी फार प्रशंसा झाली. पण, त्या ग्रंथांत नवीन असें कांहीच नाही. गणित सोपें व सूक्ष्म करण्याकरिता त्यांत कांही रीति योजल्या आहेत इतकेंच. माझे इतर ग्रंथ मात्र नवीन कल्पनांनी व

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
मकर संक्रांत, १९२३

अनुक्रमणिका

शोधांनी परिपूर्ण असून, भारताला पुढील काळांत फार उपयोगी पडतील असे आहेत. ' धर्मरहस्य ' व 'Social Institutions in ancient India' ह्यांत दाखविलेला मनुष्यधर्मीचा व वर्णव्यवस्थेचा इतिहास, ' चिकित्सापरीक्षण ' व 'Bodily reaction ' यांत प्रतिपादून सिद्ध केलेले शरीरप्रतिक्रियेचे नियम, आणि प्रत्यक्ष चिकित्सेतील अनेक कूटप्रश्नांची उत्तरें, ' वैदिककालगणनापद्धति'तील तेव्हांच्या युगपद्धतीचें स्वरूप, ' धर्मरहस्यां'तील धर्मांच्या मूलतत्वाचें व ' सच्चिकित्साप्रकाशिकें'तील ' चिकित्सातत्वाचें विवेचन—हें सर्व नाविन्यपूर्ण असून भारतीयांना व जगाला पुढील काळांत अत्यंत उपयुक्त होईल. पण मला सर्वांत जास्त महत्त्व कशाचें वाटत असेल तर तें माझ्या उपनिषद्‌विषयक ग्रंथांचें !"–
आणि आश्चर्याची गोष्ट ही की, दप्तरींचे उपनिषदांवरील चारहि ग्रंथ प्रकाशनाची वाट पाहत दप्तरांत पडून आहेत...

मागे 'उन्मेष'ला दिलेल्या मुलाखतींत भाऊजींनी असे उद्गार काढले होते की "मी जन्मभर खपून राष्ट्राचें ऋण फेडून कृतकृत्य झालों आहे. माझें कर्तव्य मी केलें. राष्ट्राला त्याचा उपयोग वाटल्यास त्याने आपलें कर्तव्य करावें. मला कसलीच स्पृहा नाही. "

विद्वद्रत्नांचे ग्रंथ इंग्रजींत प्रसिद्ध करण्याची लो. टिळकांची फार इच्छा होती. तात्यासाहेब कोल्हटकर तर नेहमी म्हणावयाचे कीं, दप्तरींच्या सगळ्या ग्रंथांची जर इंग्रजींत भाषांतरें झालीं तर ज्योतिर्गणित, वेदविद्या, धर्मशास्त्र, प्राचीन इतिहास, वैद्यक, तत्वज्ञान वगैरे शास्त्रांतील त्यांच्या प्रतिभाकर्तृत्वाची प्रभा सर्व जगभर फांकेल.

पण या दोन महापुरुषांच्या अकाल निधनाने त्यांची इच्छा पूर्ण करण्याची नैतिक जबाबदारी त्यांचा वारसा सांगणाऱ्या सुविद्य महाराष्ट्रावर पडत नाही काय ? भारताला आंतर्राष्ट्रीय कीर्ति मिळवून देणारे विद्वद्रत्नांचे क्रांतिकारक शोध भारताच्या तर असोच पण स्वत:ला बुद्धिवादी म्हणविणाऱ्या महाराष्ट्रांतील विद्यापीठांच्या साहित्यसंस्थांच्या व ज्ञानपिपासू रसिकांच्या दृष्टींतून निसटावेत हें केवढें आश्चर्य !

टिळक व कोल्हटकर यांच्यासारख्या युगपुरुषांनी पुरस्कार करून गौरविलेल्या विद्वद्रत्नांचे ग्रंथ प्रसिद्ध न होण्यांत केवळ योगायोगच नाही; आपल्याला न पटणाऱ्या मतांची जाणूनबुजून अवहेलना करण्याची राष्ट्रघातकी उपेक्षाबुद्धि आहे यांत. भाऊजींना साहित्याची डॉक्टरेट देऊन त्यांच्या उग्र वा एकाग्र ज्ञानोपासनेने स्वत:ला पुनीत व भूषित करणाऱ्या नागपूर विद्यापीठाने किंवा त्यांना मानाची शालजोडी देऊन त्यांच्या विद्वत्तेचा गौरव करणाऱ्या विदर्भ साहित्य संघासारख्या या प्रांतांतील अग्रगण्य साहित्यसंस्थेने या बाबतींत कां लक्ष देऊं नये ? ज्या विद्यापीठाने व्याख्यानांच्या अद्वितीयत्वाबद्दल भाऊजींना सुवर्णपदक दिलें, यास विद्यापीठाकरिता पूर्वीपेक्षाहि अधिक जिव्हाळ्याच्या व राष्ट्रीय पुनरुत्थानाला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आवश्यक अशा विषयावर सतत नऊ वर्षे परिश्रम करून भाऊजींनी लिहून काढलेली व्याख्याने!— ज्ञानान्मोक्षाच्या साधनेंत आयुष्याचीं तपेंच्या तपें घालविणाऱ्या भाऊजींसारख्या ज्ञानोपासकाच्या ग्रंथांचा गौरव 'विद्या परं दैवतम्' हें ब्रीदवाक्य धारण करणाऱ्या विद्यापीठाने नाही तर कुणी करावा? नागपूर विद्यापीठांतील किनखेडे व्याख्यानमाला समितीचे सदस्य व कै. रा. ब. तात्यासाहेब किनखेडे यांचे सुविद्य ज्येष्ठ चिरंजीव श्री. चिंतामणराव उर्फ राजाभाऊ किनखेडे या दृष्टीने प्रयत्न करून विद्यापीठाच्या लौकिकांत भर घालण्याचें श्रेय संपादन करतील काय?

गेल्या २२ नोव्हेंबर (१९५०) रोजी भाऊजींना ७१ वें वर्ष लागलें. आयुष्याच्या संध्याकालांतहि ग्रंथाभ्यासांत मग्न असणाऱ्या भाऊजींच्या ज्ञानगंभीर मुखावरलें प्रसन्न हास्य पाहिलें म्हणजे ज्ञानान्मोक्षाच्या साधनेसाठी आयुष्याचा होम करणाऱ्या या आधुनिक महर्षीसमोर मस्तक आदाराने नम्र होतें. पण त्याबरोबरच, गेलीं तीन तपें ज्ञानविज्ञानाच्या तेजाचा प्रभावशाली प्रकाश ज्या देहमंदिरांतून बाहेर पडला तें मंदिर मगीरथकष्टांनी मोडकळीस आल्याचें पाहून अंतःकरण व्याकुळ झाल्यावाचून राहत नाही.

सत्य-ज्ञान हा भाऊजींचा परमेश्वर आहे, जिज्ञासा हें त्यांचें जीवन आहे व ऋजुता, शुचिता व निरिच्छता हा त्यांचा स्वभाव आहे. भारतांतील विद्यापीठें, संशोधक, साहित्यसंस्था, धनिकवर्ग व सरकार भाऊजींचे ग्रंथ प्रसिद्ध करण्याचा संकल्प करून त्यांच्या डोळ्यादेखतच त्यांच्या जीवनध्येयाची परिपूर्ति करून दाखविण्याचें श्रेय संपादन करतील काय?

शेवटी, गेलीं ४० वर्षे आपल्या प्रतिभाकर्तृत्वाच्या प्रभेने ज्ञानाच्या विविध क्षेत्रांत अनन्यसाधारण प्रभुत्व गाजविणाऱ्या या बुद्धिवादी महर्षीला "पुनः नमस्कार पुनः पुनः ते" करून व त्यांना उदंड आयुरारोग्य लाभो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करुन आपली भावसंकुलता आवरती घेतों.

इथेच—

इथेच आहे सगळा शेवट, इथेच सीमा पार जाहली;
इथेच कोण्या दोन जिवांनी, अभिन्नतेचीं जाळीं विणलीं॥१॥
इथेच सगळें सुटलें बंधन, इथे बंधनें नवल गुंफिलीं;
इथेच अपुऱ्या दोन जिवांनी, पूर्णत्वाची आन घेतली॥२॥
इथेच 'मी'ची संपे जाणीव, इथे समाधि दीर्घ लागली;
इथेच मृत्यो कुशींत घे तव, चोर पाऊली जरी अकालीं॥३॥

—लीला वाचासुंदर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वितरीत सुषमा रजत मुलायम—

वितरीत सुषमा रजत मुलायम—
पदन्यास करि मदिर मानिनी
नील रुजाम्यावर व्योमाच्या
सलज्ज विचकत चंद्राराणी

गंधमाधुरी श्वसनामधली
धुंद वाहलें अंबर हुंगुन
अन् स्पर्शे तर फुलती तनुवर
तारांचे रोमांच तराहुन !

पिउन इशारा कटाक्षांतला
सिंधूर्मींची तुफान सळसळ !
सुप्त किनारा चुंबित चुंबित
तरंगावली सरके श्यामल !

मंद करांचा विळखा नाजुक
वसुंधरेच्या कटीसभोंती
—उलगडलेल्या स्नेहलतेच्या
रातराणिने विणल्या ज्योती !

शहारलेला चकोर गुंफी
कवीकल्पनांच्या सुमहारा
पर्णराजिच्या उरांत शिरुनी—
करित गुदगुल्या अवखळ वारा !

लोपुन अंतर स्वर्गधरेंतिल
अवतरती सुर अवनितलावर
कोमल करतल मस्त पऱ्यांचे
दाबित चुंबित कुणि कामातुर !—

—उ. रा. गिरी

'याल तुम्ही का भूवर धावुन?'

सत्याची पावरी सारखी
वाजविली तूं जेथे अनुदिन
तिथे असत्याचेच चौघडे
पदोपदी वाजती निनादुन १

'मोहन ! मोहन !' गाता गायन
पुलकित गेली जनता, होउन
त्याच मनोहर नामोच्चारे
हाणतात दुर्बलावरी घण २

तुझ्याच जयजयकारें जेथे
निवडणुकीच्या पेट्या फिरवुन
तव प्रतिमेला हार घालुनी
स्वतः मिळविती जें सिंहासन ३

भारतवर्षी आम्ही करतों
दरवर्षि साजरा जन्मदिन
पालथ्याच घागरींवरी जल
तसेंच जातों सारें विसरून ४

दानवांत मानव्याआणण्या
झिजविलेंस तूं कणकण जीवन
परी पशुत्या आज पाहुनी
तुटेंच वाइल हृदय विदारून ५

सत्य अहिंसेच्या वक्षावर
घाव पडावे जेथे दारूण
लाथ मारूनि स्वर्गसुखाला
याल तुम्ही कां भूवर धावुन ६

—उषा सदाफळ

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

भारतीययुद्ध कालनिर्णय

(भाऊजी दप्तरींचें पत्र)

श्रीयुत संपादक ' युगवाणी ' यांस सा. न. वि. वि.

मला विदर्भसाहित्यसंघाच्या एका चांद्याच्या सभासदाचें पत्र आलें आहे. त्यांत त्याने आपलें नांव दिलें नसल्यामुळे त्याला खाजगी उत्तर पाठवितां येत नाही. म्हणून आपल्या मासिकांतूनच उत्तर देणें शक्य व आवश्यक आहे. तरी पुढे दिलेलें तें उत्तर प्रसिद्ध करण्याची कृपा करावी.

'युगवाणी'च्या मे १९५० च्या अंकांत वरोड्याचे श्रीयुत सदाशिवराव काकडे यांचा "भारतीययुद्धविषयक घटनांचा काल" ह्या विषयावरील लेख प्रसिद्ध झाला आहे. त्या विषयावरील माझें मत, अर्थात तो लेख वाचल्यानंतरचें, 'युगवाणी'तून प्रसिद्ध करावें अशी विनंती मला त्या वि. सा. संघाच्या सभासदाने केली आहे. त्या विनंतीस मला उत्तर द्यावयाचें आहे.

"महाभारतीय युद्धकालनिर्णय" हा माझा लेख सुमारे १९२० च्या सुमारास "विविधज्ञानविस्तारां"तून प्रसिद्ध झाल्यानंतर ह्या विषयावर नियत-कालिकांतून पुष्कळ वादविवाद झाला आहे. त्या वादविवादांत श्री. काकडे ह्यांनी-हि भाग घेतला होता. वादविवादांतील माझे प्रतिस्पर्धी ज्योतिःशास्त्र व भारतीय ज्योतिषाचा इतिहास न जाणणारे तरी होते किंवा महाभारतांतील ज्योतिषविषयक वचनें प्रक्षिप्त आहेत असें म्हणणारे तरी होते. ह्या सर्वांची समजूत घालण्याचा मी पराकाष्ठेचा प्रयत्न केला पण त्यांची समजूत पटली नाही. कारण ह्या विषयाचा सांगोपांग विचार करण्यास ते कधीच तयार झाले नाहीत. एखादें वचन धरून ठेवावें व तद्विरुद्ध असलेलीं दुसरीं वचनें टाकून द्यावीं असेंच त्यांचें धोरण असे. सर्व वचनांचा विचार त्यांनी कधींच केला नाही. म्हणून आतां अशांना कांहीच उत्तर द्यावयाचें नाही असें ठरविलें आहे. ज्यांना माझें प्रतिपादन व मत पहावयाचें असेल त्यांनी नागपूर युनिव्हर्सिटींत झालेल्या माझ्या व्याख्यानाचें पुस्तक नामे " The astronomical method and its apptication to the Chronology of Ancient India " हें रजिष्ट्रारकडून मागवून वाचावें. म्हणजे त्यांची इच्छा पूर्ण होऊन त्यांना सत्याचें ज्ञान होईल. येथे फक्त तेथील प्रतिपादन समजण्याकरितां थोडें दिग्दर्शन करतों.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ह्या विषयाचे दोन भाग पडतात. एक, युद्ध कोणत्या वर्षी झालें आणि दुसरा, तें कोणत्या महिन्याच्या कोणत्या तिथीस झालें. हे दोन भाग स्वतंत्र नसून परस्परावलंबी आहेत म्हणून त्यांचा स्वतंत्रपणे विचार करतां येत नाही. श्रीयुत काकडेसारख्यांची चुकी हीच आहे की तें दुसऱ्याच भागाचा स्वतंत्रपणे विचार करतात. मी प्रथमतः दुसरा प्रश्न स्थूल मानाने सोडविला आणि ठरविलें की युद्ध कार्तिकाच्या अमावस्येस किंवा मार्गशीर्षात केव्हा तरी सुरू झालें. ह्या उत्तराविषयी वाद नाही. ह्या उत्तराच्या साह्याने ग्रहस्थितीवरून वर्ष नक्की ठरविलें. आणि वर्ष नक्की ठरविल्यानंतर महिना व तिथि नक्की ठरविली. माझी खात्री आहे की ज्योतिःशास्त्रगणित जाणणारा कोणीहि मनुष्य भारतांतील ग्रहस्थितीवरून दुसरें वर्ष ठरवूं शकणार नाही. आणि तें वर्ष नक्की ठरविल्यानंतर कार्तिक वद्य अमावस्येहून भिन्न तिथि ठरवूं शकणार नाही आणि वचनांतील परस्परविरोध पाठभ्रंशामुळे उत्पन्न झाला किंवा भाषेचा अर्थ न समजल्यामुळे भासतो असें त्यांस मानावेंच लागेल. हा निर्णय टाळण्याकरितां ज्योतिषगणित जाणणारे भारतांतील ग्रहविषयक वचनें प्रक्षिप्त व अविश्वसनीय आहेत असें म्हणतात. पण प्रक्षेप मागण्यापेक्षां पाठभ्रंश मानणें किंवा शक्य असेल तर भाषेचा भिन्न अर्थ करणेंच अधिक न्याय्य आहे हें उघड आहे. असो, ह्यापेक्षा सुज्ञांकरितां जास्त लिहिण्याची आवश्यकता वाटत नाही. कळावें, लोभ असावा ही विनंती.

आपला

के. ल. दप्तरी

कुठे तुझा पत्ता ?

छंद–जीवनलहरी,

पाचोळीं सळसळ, हरिणी थांबली, दुरून शीळ ये, थबकली कळी १.
पल्याडच्या जळीं, वल्हियांची धडक, तिच्या हृदयांत, होई धकधक २.
थरकलें जरा, दलाचें इरलें, लागतां चाहूल, दिल बावरलें ३.
पहांटेच्या वाऱ्या-, हलुंच पातला, कळीला लाजऱ्या, जलाच्या लाटेला ४.
—अपुल्या लाघवें, केलेंस तूं धीट, तिने खुलें केलें, आपुलें कपाट ५.
ढगांच्या पापणीं, लपलीं लोचनें, ठेऊन ठेव तूं, गेलास निघोनी ६.
आकाशीं सावळें, खळें पुनवेला, चोरीचा लावी रे, जग आळ तिला ७.
प्रपाताची धार, ग्रीष्मांत बोथटे, सूर्याचे कठोर, तिच्या शिरी कांटे ८.
तूंच तिला दिला, धिटाईचा कित्ता, आतां रे भेकडा, कुठे तुझा पत्ता? ९.

—भा. आ. पांढरीपांडे

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रंथसमीक्षा

पा व ना

गोपाळ सदाशिव गिरडकर

*

मध्यम वर्गातील विविध व्यक्तींचें स्वभावचित्रण सहजतेने सुस्पष्ट करणारी श्री. गोपाळ सदाशिव गिरडकर यांची 'पावना' ही हृदयंगम व रोचक कादंबरी नांवाप्रमाणेच सार्थ असून मनाचा ठाव घेणारी आहे. तिचें कथानक साधें व समाजांत नेहमीं प्रत्ययास येणारें असलें तरी तें हृदयस्पर्शी व उत्कंट आहे.

कवि माधव हा गरीबींतून मोठ्या कष्टाने उच्च शिक्षण घेतो. बिम्बा आणि शोभा ह्या दोन श्रीमंत घराण्यांतील तरुणी त्याच्यावर अनुरक्त असतात. बिम्बा आपली मैत्रिण शोभा हिच्यासाठी बॅ. सुरेश पटवर्धन ह्या घमेंडखोर, संशयी व कुत्सित दृष्टिकोणाच्या तरुणाशी विवाह करते. मनोहर दौंडकर हा तरुण शोभेवर प्रेम करीत असतो व तो शोभा व माधव यांच्या विवाहाआड येतो. माधव अनेकांचा उपहास व उपमर्द सहन करून आपलें सरळ व स्वच्छ जीवन घालविण्याचा प्रयत्न करतो. त्याचा दाभोळकर हा मित्र त्याच्या सहाय्यार्थ नेहमीच कामीं येतो. तो कुसुमवर प्रेम करतो. ह्या सर्वांच्या प्रेममय जगतांत मनुभाई नांवाचा स्त्रीलंपट व धूर्त व्यापारी शिरकाव करून घेऊन प्रथम बिम्बा व नंतर कुसुम यांचें शील भ्रष्ट करण्याचा प्रयत्न करतो पण तो शेवटीं अयशस्वी ठरतो. सुरेश बिम्बाचा संशय घेऊन तिला मारहाण करतो व ती गृहत्याग करते, आणि मनुभाई कुसुमला भूलथापा देऊन तिचें पावित्र्य नष्ट करण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा बिम्बा आपल्या अत्याचाराचा सूड घेण्यासाठी आणि कुसुमच्या शीलाचें रक्षण करण्यासाठी मनुभाईच्या अंगावरून मोटार चालवून त्याला ठार करते व त्या अपघातांत ती स्वत:हि ठार होते. विमसतोषी मनोहरलाहि अपघात होऊन तो अधु होतो व केलेल्या कर्मांची कबुली देतो. शोभा व माधव यांचा विवाह घडून येतो व आपल्या पवित्र स्त्रीला समजून न घेतां तिच्या मृत्यूला आपणच कारणीभूत झाल्याच्या पश्चात्तापाने सुरेश पटवर्धन 'पावना' ठरलेल्या बिम्बाच्या शवग्यावर अश्रु ढाळीत असतो.

कादंबरीचें कथानक असें असून त्याची मांडणी मोठ्या कुशलतेने करण्यांत आली आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बिम्बा ही ह्या कादंबरीतील प्रमुख नायिका आहे. तिच्या मनाचा मोठेपणा समजुतदारपणा आणि स्वार्थत्याग करण्याची प्रवृत्ति आणि माधव ह्या प्रमुख नायकाचें निष्कलंक, सोज्वळ व सहृदय जीवन रंगविण्यांत, कादंबरीकाराने आपल्या कलागुणांची चमक दाखविली आहे. तसा खलनायक प्रामुख्याने ह्या कादंबरींत नाहींच. बॅ. सुरेश, मनोहर दौंडकर किंवा मनुभाई हीं पात्रें अधून मधून खलनायकाची भूमिका आचरत असलीं तरी तीं त्या त्या प्रसंगापुरतीं स्वार्थी स्वरूपाचींच असतात. ह्या सर्व पात्रांचा स्वभाव–परिपोष साधण्यांत कादंबरीकाराने बरेंच यश संपादिलें आहे. आईवडिलांनी केवळ श्रीमंतीकडेच लक्ष न देतां गुणी, विद्वान व दिलदार तरुणांचीच कदर करून आपल्या मुलींचें भवितव्य ठरवायला पाहिजे. असा स्पष्ट इषारा कादंबरीकाराने प्रसंगानुरोधाने दिला आहे.

कादंबरीचें कथानक साधारणतः पृष्ठ ५८ पासून वेग घरतें व हा वेग १०२ पृष्ठानंतर तर वाचकाला सारखा गुंगवून ठेवतो. वाचक त्या त्या घटनांशी पूर्णतः एकजीव होतो.

तसें पाहिलें तर ह्या कादंबरीत कांही कांही भाग अनावश्यक घातला गेल्याने कथानकाचा ओघ अधून मधून मंदावतो. सुरेश पटवर्धनचें इंग्लंडमधील वास्तव्य व त्याचा जोन्स नांवाच्या तरुणीचा संबंध कथानकाशी मुळीच जुळता नाही. (पृ. ४३ ते ४६ व पृ. ९५ ते ९८) तद्वत्च सुरेश इंग्लंडाहून परत आल्यावर, बिम्बाशी विवाहबद्ध होऊन तिच्याबरोबर ताजमहाल पहायला जातो तेव्हा रोममधील सिनोरीना डायनेला ह्या तरुणीशी आलेल्या संबंधाचा विचार करण्यांत गढून जातो व त्या प्रसंगाची दीर्घपणे आठवण करीत बसतो. (पृ. ११९ ते १२७) हा भाग मूळ कथानकाचे औचित्य भंग करणारा आहे. मुद्रितें बारकाव्याने तपासलीं गेलीं नसल्याने बरेचसे अशुद्ध शब्दप्रयोग भातांतील खड्यां-प्रमाणे बोंचतात. पण, हे संपूर्ण दोष जमेस घरूनहि कादंबरी वर उल्लेखिलेल्या कला गुणांमुळे ठिसूळ वाटत नाही.

ना. रा. शेंडे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

क र—पा श

ना. ल. पोतदार

अखिल जगताला प्रकाशाची दिवाळी करणाऱ्या तेजोभास्कराचा प्रवास संपला. आकाशाचें वैभव नष्ट झालें. हळूहळू पृथ्वीवर अंधाराचें साम्राज्य पसरलें. अनुकूल अवसर मिळाल्यामुळे ज्योत आपल्या दिव्य सौंदर्याने तळपूं लागली. इतःस्ततः फेकलेल्या मंद प्रकाशाचा झोत पाहूनच की काय तिला अवर्णनीय आनंद होत होता. झोताच्या झगझगाटाच्या जाळ्यांत कोणता असा डोळे दिपून अडकतो हेंच तिला जणू पहावयाचें होतें.

अप्सरेचें अनुपम सौंदर्य तिच्यांत मुसमुसत होतें. तरतरीत तारुण्य ओसंडून वहात होतें. रात्रीची प्रणयोन्मादाची वेळ. आकाशांत तारे फुलले. तिच्या मनांत प्रणयी भावनांचीं नाजुक फुलें फुललीं. कुणाचा तरी मुखचंद्र पाहून तिच्या हृदयसागरांत हर्षाच्या ऊर्मी उंच उठल्या. नृत्याच्या रूपाने आनंद प्रगट होऊं लागला. कलावंतीणीच्या क्रौर्याची क्रूर पण मादक चमक तिच्या नेत्रांत दिसूं लागली.

वाऱ्याच्या झुळकीवर आरुढ होऊन प्रणयी पतंग तिच्याकडे धाव घेत होता. त्याला ती जगांतील साऱ्या सौंदर्याची शिराणीच वाटत होती. त्याच्या प्रणयलुब्ध मनाच्या आरशांत तिचेंच प्रतिबिंब पूर्णपणे पडलें होतें. अवयवांतील सारी शक्ति डोळ्यांत आणून ज्योतीचें सौंदर्य बघून त्याने आपल्या नेत्रांचें पारणें फेडलें. स्पर्शसुख अनुभवण्यासाटी प्रणय गुंजन करीत तो तिच्या जवळ जवळ जाऊं लागला.

गोड स्वर कानीं पडतांच ज्योतीने मोहकतम रूप धारण केलें. खडतर तपश्चर्या करणाऱ्या विरक्त ऋषींनाहि मोहित करणारें नयनमनोहर नृत्य तिनें सुरु केलें. तिचें सौंदर्यतेज अधिकच फांकलें.

चंचल, मादक व भेदक नेत्रकटाक्षांनी विद्ध झालेल्या व नृत्यांतील उद्दीपक हावभावांनी आकृष्ट झालेल्या, सौंदर्यलुब्ध प्रणयी पतंगाला प्रीतीची भूक गाढ आलिंगनाने शमविण्याची इच्छा झाली.

ज्योत आपल्या जागेवरूनच पुढे होण्याचा प्रयत्न करूं लागली. पतंगाचें हृद्गत जाणूनच जणूं तिनेहि आपले करपाश पुढे केले.

भोळा आलिंगनोत्सुक पतंग! त्याच्या प्रणयानंदांत गिरक्या घेत घेत त्याच्या आयुष्याचाहि शेवट होणार तर!

ज्योतीने आपले करपाश पसरले
पतंगाने त्यांत स्वतःला आबद्ध केलें
अगदी झेप— अंतिम झेप घेऊनच—
ज्योतीचें तें हास्य—
पण—

मीलनानंतर तेथे सर्वत्र अंधार पसरला!

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गे माय मराठी

गे माय मराठी अंगाखांद्यावरती ॥ धृ ॥
खेळलों, वाढलों, तुझीच प्राशुन प्रीती ॥
शृंगार सजविला तव थोरामोठ्यांनी,
वैभवें नटविलें कितीक सत्पुत्रांनी,
नी कंठ कवींचे शिणले तुझीया गानीं,
मी असा करंटा मिळविन पदींची माती ॥ धृ ॥ १
मी कूस उबवली तुझी व्यर्थ गे आई,
गाईली सांग तूं कशास मज अगाई !
मज कळे न होऊं तुझा कसा उतराई,
भारावून गेलों, विनम्र हा तुज पुढती ॥ धृ ॥ २.
मी पैंजण होऊन राहीन तव पायांत,
मी अश्रू होऊनी बसेन तव नयनांत,
स्मितहास्य होऊनी गालावरील खळ्यांत,
पूजना होउनी गिरांजनातील ज्योती ॥ धृ ॥ ३.
कुणी अमाप दौलत पदीं दिली उधळून,
सौंदर्य-जान्हवीत तुला घडविलें स्नान,
चालेल कां परी हें तुळशीचें पान !
कंगाल आणुं मी कुठुनी माणिकमोती ! ॥ धृ ॥ ४.

—सुरेश भट

जाणार ?—जा !

जाणार तूं ?—तर जा खुशाल
जा आवरोनी मोहजाल
होतांच पाशांतुनि मुक्त—
क्रीडावया पृथ्वी विशाल !

सीमा पडे मम पौरुषास
नानापरी सुचती विलास
हो विश्व सारें दृष्टिआड
थांबे मनाचा अन् विकास !

हे रेशमाचे प्रीतिबंध
दूरावतां घेईन छन्द—
सेवूनि विश्वाला अनन्त
हुंगीन तृप्तीचा सुगंध !

तुझ्यामुळे जडलीं जिवास
हीं बन्धनें तुझाच ध्यास
उन्माद प्रीतीचा मनांत
घोटाळतां तूं आसपास !

जाणार तूं ? जा. कां उशीर ?
नाही मना लवमात्र धीर
जाशील तूं, शुभ तो मुहूर्त
मानेन मी चित्तें गभीर !

जाणार तूं तर जा खुशाल
जा आवरोनी इन्द्रजाल
बोलाविते पृथ्वी असीम
चित्ता अतां न रुचे महाल !

—वसंत वऱ्हाडपांडे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हिंदी मराठी संघर्ष

ल. ज. खरे

*

दर्यापूरचे नागरिक श्री. खरे यांचा हा लेख मुद्दाम देण्याचें कारण मराठी भाषी माणूस किती निर्भयपणे व निरोगी विचार करूं शकतो याची कल्पना वाचकांस यावी. "युगवाणी" मासिकांत भाषाविषयक प्रश्न निःपक्षपातीपणे चर्चिले जावेत असें धोरण असल्याने प्रस्तुत लेखाला दुसरी बाजू असली तरी ती आम्ही देत आहोत. "युगवाणी"च्या दिवाळी अंकांत श्री. दिवाण यांचा लेखहि याच दृष्टीने दिला होता. त्याला धरूनच श्री. खरे यांनी आपली बाजू मांडली आहे. —सं०

हिंदी राष्ट्र भाषा ठरली व ब्रिटिश अमलाखाली इंग्रजीचें जें स्थान होतें तें हळूहळू हिंदीला देण्यांत यावें असें हि सर्वानुमतें ठरलें. या ठरावाला मराठी भाषिकांनीं अंतःकरणपूर्वक उचलून धरलें होतें. ज्यास्तींत जास्त लोक जी बोलूं व समजूं शकतात, व शिकण्यासहि जी सोपी अशीच राष्ट्भाषा पाहिजे या दृष्टीने त्यांनी योग्य तेंच केलें. विचारपूर्वक याप्रमाणे निश्चय केल्यावर त्या संबंधीं शंका कुशंका काढीत बसणें चांगलें नव्हे. जें ठरलें तें मनोभावे व्यवहारांत आणावें, वाटेंत ज्या अडचणी येतील त्यांना प्रयत्नपूर्वक तोंड द्यावें हेंच प्रत्येक नागरिकाचें कर्तव्य आहे. भाषा मुख्यतः विचारविनिमयाचें साधन आहे ही गोष्ट या विषयावर विचार करितांना केव्हांहि दृष्टिआड करितां कामा नये. मराठी भाषा हिंदी पेक्षा जास्त प्रगट असेल, तिच्यांतील आजपर्यंतचें लिखाण वाङ्मय दृष्ट्या जास्त योग्यतेचें असेल व आजचे तिचे प्रख्यात लेखक हिंदी लेखकांपेक्षां जास्त प्रभावी असतील. परंतु अखिल भारतांत विचार विनिमय करण्यास मराठी पेक्षां हिंदी जास्त उपयोगी असल्यामुळे आपल्या भाषेचें प्रेम व अभिमान किंचित् कमी करून हिंदी आत्मसात् करण्याचें आपण प्रयत्न केले पाहिजेत.

भाषे पेक्षां विचार व कृती यांस केव्हांहि जास्त महत्व आहे. ज्ञानेश्वरीचें किंवा तुकारामाच्या गाथेचें श्रेष्ठत्व तिच्यांतील विचारांवर आहे, भाषा सौष्ठवावर नाही. तसेंच मराठी भाषिकांना आपलें स्थान स्वतंत्र हिंदुस्थानांत टिकवावयाचें असेल तर तें मराठी भाषेच्या—उत्कर्षानें नव्हे, तर त्यांच्या विशिष्ट विचारांनी व आचारांनीच टिकवावें लागेल. महाराष्ट्रीय बाणा कायम ठेवा. म्हणजे महाराष्ट्रीयांचें स्थान भारतांत अचल राहील. मध्यप्रदेशाची राज्यभाषा फक्त हिंदी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

झाल्यास, मराठी व हिंदी यांमध्यें विरोध कल्पून आपण जर हिंदीची उपेक्षा करूं, तरच "शोषण" होईल, एरवीं होणार नाहीं.

इतिहास पाहिला तर कोणत्याहि भाषेचा उत्कर्ष ती बोलणाऱ्या लोकांच्या उत्कर्षाबरोबर होत असतो असें दिसून येईल. रोमन लोकांनीं सर्व युरोपखंड जिंकलें, व कित्येक शतकें आपली सत्ता त्यावर टिकविली. म्हणून ग्रीकभाषा व वाङ्मय श्रेष्ठ असून देखील लॅटिन भाषेचा पगडा सर्व युरोपभर बसला व व रोमन साम्राज्य बुडाल्यावरहि कित्येक शतकें तो कायम राहिला. आर्यावर्तांत आर्य आले त्यांनीं सर्व देश व्यापला, तेव्हा त्यांच्या संस्कृत भाषेला मान्यता मिळाली, व अल्पांशाने ती आजहि अस्तित्वांत आहे. मराठीलाहि तसा योग महाराष्ट्रीयांच्या कर्तृत्वाने आणून दिला होता. परंतु मराठी राज्याच्या पहिल्या शतकांत जें महाराष्ट्रीयांचें कर्तृत्व होतें, त्याला दुसऱ्या शतकांत ओहोटी लागल्यामुळे मराठी साम्राज्य बुडालें व मराठीला देशांत अग्रस्थान मिळावयाची संधी गेली. त्याबद्दल आतां हळहळून उपयोग नाही. मुद्दा ध्यानांत ठेवावयाचा तो हा कीं भाषेमुळे भाषिकांचें स्थान ठरत नाही, तर भाषिकांच्या कर्तृत्वावर भाषेचा गौरव अवलंबून असतो. सतराव्या शतकांत व अठराव्या शतकाच्या पूर्वार्धांत ज्या गुणांनी मराठी भाषिक पुढे आले, ते गुण जर पुन्हा त्यांनी अंगीं आणलेतर, निवळ भाषेच्या जोरावर त्यांच्यावर कोणताहि समाज आक्रमण करूं शकणार नाही.

पण हल्लींचें युग लोकशाहीचें आहे. म्हणून त्या बरोबरच त्यांनी राष्ट्रभाषेकडे दुर्लक्ष करितां कामा नये. इंग्रजी अमदानीत इंग्रजीला प्राधान्य मिळाल्यावर त्या भाषेकडे जितकें लक्ष द्यावयास पाहिजे होतें, तितकें आपण दिलें नाही. इंग्रजी सफाईने लिहिणारे लेखक व बोलणारे वक्ते आपल्यामध्ये फारसे झाले नाहीत. त्यामुळे राज्यकारभारांत व राजकारणांत मराठी भाषिकांचें जेवढें तेज पडावयास पाहिजे होतें तेवढें पडलें नाही. बंगाली, मद्रासी किंवा उत्तरप्रदेशी लोकांत बृहन्महाराष्ट्रीयांपेक्षा जास्त राजकारण आहे किंवा त्यांची बुद्धि जास्त प्रखर आहे असें नाही. परंतु सर्व देशांत विचार व्यक्त करण्याचें साधन जी इंग्रजी भाषा ती त्यांनी जास्त आत्मसात केली, व त्यामुळे एकंदर देशाचे राजकारणावर त्यांचा प्रभाव जास्त पडला. महाराष्ट्रीय व विदर्भीय मागे पडले व त्यामुळे महाराष्ट्र विदर्भाची व परंपरेने अखिल भारताची हानि झाली. अशी हानि पुन्हा होऊं नये म्हणून राजकारणांत पडूं इच्छिणाऱ्या अगर राज्याची नोकरी करूं इच्छिणाऱ्या प्रत्येक मराठी भाषिकाने हिंदीवर प्रभुत्व मिळविण्याचा प्रयत्न अवश्य करावा.

आणि महाविदर्भांतील लोकांना तर हें सहज साध्य आहे. आपल्यापैकीं बहुतेकांस हिंदी समजते व मोडकें तोडकें बोलतां येतें. प्रयत्न केल्यास आपण हिंदी भाषा एका वर्षांत चांगली लिहूं व बोलूं शकूं. हिंदी भाषेच्या जोरावर कोणासहि आपल्यावर आक्रमण करितां येणार नाही. तसेंच हिंदीच्या सरकारी पुरस्कारामुळे 'हिंदी व मराठी जनतेंत द्वेष व संघर्षाची वाढ होऊन प्रांत खिळखिळा व शक्ति-हीन झालेला पाहण्याचें त्यांच्या नशिबीं येईल,' ही भीतिहि निष्कारण ठरेल.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

क्षमस्व

[अंकाची छपाई प्रतिकूल परिस्थितींत होत असल्याने अंकांत मुद्रितांचे दोष पुष्कळ राहून जात असल्याची जाणीव मला गेल्या दोन तीन अंकापासून टोंचत आहे. पण माझाहि इलाज अपुरा पडतो. या अंकांत टाईप उडणें किंवा पुसट अक्षरें येणें या अपरिहार्य दोषांसहित खालील चुका टळकपणे राहिल्या आहेत; त्या वाचकांनी मला क्षमा करून सुधारून घ्याव्या अशी विनंति आहे. कळावें. —संपा० युग०]

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
८५	४	यांनी	यांना
८५	२३	तेंप	तपें
८७	२४	ही	नाही
९३	२२	Advice	Advise
१०१	३०	Sustems	Systems
१०५	१४	मुक्ती	मुक्तीच्या
१०६	२०	फावेल	फांकेल
११५	३	कल्पणा	कल्पना
११५	शेवटची	मध्यप्रदेशाची	मध्यप्रदेशाची
११६	५	सत्त्ता	सत्ता
११६	१५	मापेचा	भाषेचा

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य मंदिराचा कोनशिला समारंभ

★

विदर्भ साहित्य मंदिराचा कोनशिला समारंभ नागपूर मुक्कामी रविवार ता. १५ एप्रिल (रामनवमी) रोजीं सकाळीं ८॥ वाजतां मध्यप्रदेशाचे शिक्षणमंत्री नामदार पंडित द्वारकाप्रसाद मिश्र यांचे हस्ते व्हायचा आहे. तरी संघाच्या सर्व सभासदांनी या प्रसंगी अवश्य उपस्थित रहावें ही विनंती.

सर्व सभासदांनी कृपाकरून हेंच जाहीर निमंत्रण असल्याचें समजावें.

आपले नम्र,

रा. पु. सगदेव
चिटणीस,

ग. त्र्यं. माडखोलकर.
अध्यक्ष,

विदर्भ साहित्य संघ.

विदर्भ साहित्यसंघाला रु. ५००० ची सरकारी देणगी

साहित्यसंस्थांना खर्चाच्या निम्मे देणगी

नागपूर, ता. २३ फेब्रुवारी

हिंदी साहित्यसंमेलनाला दरवर्षी ५००० रुपयांची अनावर्त (नॉनरिकरिंग) ग्रँट मिळत असते. ही देणगी १९५१–५२ वर्षीहि देण्यांत येणार आहे. आपल्या कार्यांत प्रगति करण्याला वाव मिळावा, म्हणून नागपूरच्या विदर्भ साहित्यसंघानेहि देणगीची मागणी सरकारकडे केली होती. म्हणून या वर्षी अंदाजपत्रकांत १०,००० रुपयांच्या देणगीची तरतूद करण्यांत आली आहे; व हिंदी साहित्यसंमेलनाला ५००० रुपये आणि विदर्भ साहित्यसंघाला ५००० रुपये देणगी देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. प्रत्येक संस्थेचा जो खर्च होईल, त्याच्या निम्मे देणगी प्रत्येक संस्थेला देण्यांत येईल किंवा जास्त खर्च झाला तरी ५००० रुपयांपेक्षां जास्त देणगी मिळणार नाही, अशी अट मध्यप्रदेश सरकारने देणगी मंजूर करतांना घातली असल्याचें कळतें.

प्रभानिवास, जेल रोड,
नागपूर नं. १.
ता. २३-२-१९५१.

रा. पु. सगदेव
चिटणीस,
विदर्भ साहित्य संघ.

मुद्रक व प्रकाशक : प. वि. बेलवलकर, व्यवस्थापक, हरिहरेश्वर प्रेस, महाल, नागपूर.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ